• पंढरपूर • रविवार, २ फेब्रुवारी २०२५
• किंमत ₹ ४ • पाने : ८

# पंढरी संचार

pandharisanchar.com | RNI-MAH-MAR/1499/2000 | • वर्ष २९ • अंक - २५३

केंद्रीय अर्थसंकल्प 2025-2026



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी शनिवारी (दि. १) लोकसभेत आर्थिक वर्ष २०२५-२६ चा अर्थसंकल्प सादर केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळातील हा पहिलाच पूर्ण अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पात मध्यमवर्गाला मोठा दिलासा देण्यात आला आहे. मध्यमवर्गाचे देशाच्या घडणीत मोठे योगदान असून, केंद्र सरकारने त्यांना दिलासा दिला आहे, असे सीतारामन यांनी सांगितले.

## कृषीसह प्राप्ती करदात्यांना मोठा दिलासा

**नवी दिल्ली :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीताराम यांनी शनिवारी सादर केलेल्या २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात प्राप्तिकरदात्यांना दिलासा देण्याची सर्वात मोठी घोषणा करण्यात आली आहे. आता १२ लाख रुपयापर्यंत उत्पन्न असणाऱ्यांना कर द्यावा लागणार नाही, हे या अर्थसंकल्पाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. गेल्या अनेक अर्थसंकल्पापासून या स्लॉटची अपेक्षा होती. कृषी क्षेत्रासाठी भरघोस तरतुदी करत, किसान क्रेडिट कार्डची मर्यादा वाढविण्यापासून ते डाळींचे उत्पादन अधिक करण्यापर्यंत अनेक निर्णयांसाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. क्रीडाक्षेत्र या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून युवा, रोजगार, पर्यटन, कृषी आणि वैयक्तिक उत्पन्न यामध्ये अत्यंत दिलासादायक असे हे बजेट आहे.

सीतारामन यांनी बजेट मांडताना शेतकऱ्यांसाठी मोठी घोषणा केली. यात शेतकरी क्रेडिट कार्डची मर्यादा दोन लाखांनी वाढवली. त्यामुळे शेतकऱ्यांना सावकाराचे दरवाजे ठोठावण्याची गरज भासणार नाही. युरिया उत्पादनात आत्मनिर्भरता वाढवण्यासाठी सरकार बंद पडलेले तीन युरिया प्लांट पुन्हा सुरू करणार आहे. युरिया पुरवठा वाढवण्यासाठी आसामच्या नामरुप येथे १२.७ लाख मेट्रिक टन वार्षिक क्षमतेचा प्लांट लावला जाईल. त्यामुळे युरियाची आयात कमी होईल; परंतु गेल्या वर्षभरात खतांच्या अनुदानात केलेली कपात आणि त्यामुळे महाग झालेल्या खतांवर उपाय सापडत नाही. कृषी मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगाला चालना देण्यासाठी मात्र अर्थसंकल्पात तरतूद नाही. डाळ आणि कापसासाठी धोरण जाहीर केले असले, तरी पूर्वीचा अनुभव लक्षात घेता शेतकरी या धोरणाला किती प्रतिसाद देतात, याबाबत साशंकता आहे.

सरकारतर्फे धार्मिक पर्यटनाला प्रोत्साहन दिले जाणार आहे. सरकारच्या कररचना आणि गुंतवणुकीबाबतच्या धोरणावर भांडवली बाजाराने नकारात्मक प्रतिक्रिया नोंदवली. देशात बचतीचे प्रमाण आधीच कमी होत असताना करबचतीचा पैसा गुंतवणुकीकडे वळवता आला असता; परंतु सरकारने त्या दिशेने फारसे प्रयत्न केल्याचे दिसले नाही. सीतारामन यांनी भाषणामध्ये नवीन प्राप्तिकर कायद्याचा ओझरता उल्लेख केला. सरकार याविषयीचे विधेयक सादर करणार आहे. त्यानंतर करदाते आणि तज्ज्ञांच्या हरकती, प्रतिक्रियेनंतर त्यात सुधारणा करण्यात येईल. प्राप्तिकर कायद्याचे सुधारीत स्वरुप हे अत्यंत सोपे आणि सुटसुटीत असेल. हे विधेयक व्यक्ती, संस्था, उद्योग आणि सरकारला विविध न्यायालयीन कचाट्यातून बाहेर काढण्याचे काम करेल. त्यापोटी नाहक खटले दाखल करण्याची वेळ येऊ नये यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. या पार्श्वभूमीवर अर्थसंकल्प चांगला आहे.

### विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी वाटचाल

- विकासाला गती देण्यासाठी आणि सर्वसमावेशक विकास प्रदान करण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवणार असून, एकत्रितपणे अधिक समृद्धीसाठी आपल्या क्षमता जगासमोर मांडण्याचा प्रवास सुरू करत आहोत. सर्व विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये भारतीय अर्थव्यवस्था सर्वात वेगाने वाढत असून, गेल्या १० वर्षांचा आमचा विकासाचा इतिहास आणि संरचनात्मक सुधारणांनी जगाचे लक्ष वेधले आहे. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी वाटचाल होत असून, विकसित भारतात शून्य गरिबी, १०० टक्के दर्जेदार शिक्षण तसेच व्यापक आरोग्यसेवा यांचा समावेश असेल, असा विश्वास केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी व्यक्त केला.

**उद्दिष्टे**

- विकासाला गती, सुरक्षित सर्वसमावेशक विकास, गुंतवणुकीला चालना, कौटुंबिक भावनेत वाढ आणि वाढत्या मध्यमवर्गाची क्रयशक्ती भर वाढवण्यासाठी प्रयत्न ही पाच उद्दिष्टे असल्याचे सीतारामन यांनी प्रारंभीच सांगितले.




> केंद्रीय अर्थसंकल्पात विकासाला गती देण्यासाठी तसेच सर्वसमावेशक विकास साधण्यासाठी प्रयत्न केले आहेत. आम्ही एकत्रितपणे समृद्धीकडे वाटचाल करत असून, सर्व विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये भारतीय अर्थव्यवस्था सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था ठरली आहे
>
> — **निर्मला सीतारामन**, **केंद्रीय अर्थमंत्री**


> अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेला अर्थसंकल्प १४० कोटी भारतीयांच्या आकांक्षांचा आणि प्रत्येक भारतीयाचे स्वप्न पूर्ण करणारा आहे
>
> — **पंतप्रधान नरेंद्र मोदी**

# मध्यमवर्गीयांसाठी महाकुंभातून संजीवनी

चित्रे: स्वप्नील कुंभार

## स्वस्त

- सरकारने ३६ पेक्षा अधिक जीवनावश्यक औषधांवरील मुलभूत सीमा शुल्कात सूट देण्याचा निर्णय घेतला आहे. कर्करोग आणि इतर दुर्मिळ आजाराच्या उपचारासाठी वापरल्या जाणाऱ्या ३६ औषधांवरील मुलभूत सीमा शुल्कात सूट देण्याचा प्रस्ताव आहे.
- केंद्र सरकारने कोबाल्ट उत्पादने, एलईडी, झिंक, लिथियम-आयन बॅटरी स्क्रॅपवरील सीमा शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतला आहे.
- जहाजांच्या बांधणीसाठी लागणाऱ्या कच्च्या मालावर आणखी १० वर्षांसाठी सीमा शुल्क माफ करण्यात आले आहे.
- फ्रोझन फिश पेस्टवरील सीमा शुल्क ३० टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत कमी.
- हस्तकला बाजारपेठेला चालना देण्यासाठी सरकार विविध योजना आखत आहे.
- निळ्या चामड्याला सीमा शुल्कातून सूट देण्यात येणार आहे, यामुळे चामड्याच्या उद्योगाला चालना मिळेल.
- इथरनेट स्विचेसचे ग्रेड
- १२ प्रकारची खनिजे
- ओपन सेल (पेशी)
- सागरी उत्पादने





## १४० कोटी भारतीयांच्या आकांक्षांचा अर्थसंकल्प

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेला अर्थसंकल्प १४० कोटी भारतीयांच्या आकांक्षांचा आणि प्रत्येक भारतीयाचे स्वप्न पूर्ण करणारा आहे, अशी प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज सादर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पावर दिली. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला शुक्रवारी सुरुवात झाली. मोदी सरकारच्या ऐतिहासिक तिसऱ्या कार्यकाळातील पहिला पूर्ण अर्थसंकल्प अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी शनिवारी मांडला. संसदेत अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी माध्यमांना संबोधित केले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, हा जनतेचा अर्थसंकल्प आहे. भारताच्या विकासामध्ये आजचा दिवस एक महत्त्वाचा टप्पा आहे. १४० कोटी भारतीयांच्या आकांक्षांचा हा अर्थसंकल्प असून, प्रत्येक भारतीयाची स्वप्ने पूर्ण करणारा हा अर्थसंकल्प आहे. तरुणांसाठी अनेक क्षेत्रे खुली केली आहेत. विकसित भारताच्या ध्येयाला चालना देणारा, एक शक्ती देणारा हा अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पाने भारतात गुंतवणुकीला, पर्यटनाला चालना मिळेल. अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी झालेल्या घोषणा कृषी क्षेत्र आणि ग्रामीण भागात क्रांती घडवेल, असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला.

## महाग

केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ - २०२६



### हे होणार महाग

- इंटरॲक्टिव्ह फ्लॅट पॅनल डिस्प्लेवरील सीमा शुल्क १० टक्क्यांवरून २० टक्के करण्यात येणार आहे. यामुळे फ्लॅट टीव्हीसारख्या वस्तूंची किंमत वाढेल.
- विणलेले कपडे

## देशांतर्गत व्यापारास चालना

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** केंद्रीय अर्थसंकल्पात करदात्यांना मोठा दिलासा देण्यात आला आहे. कर कमी करण्यासाठी आणि करदात्यांच्या हातात अधिक पैसा शिल्लक राहण्यासाठी सरकारने नवीन व्यवस्थेअंतर्गत स्लॅब आणि दरांमध्ये बदल केला आहे. यामुळे देशांतर्गत वापरास मदत होईल आणि बचत आणि गुंतवणुकीला चालना मिळेल, असा सरकारचा विश्वास आहे.

नव्या प्रस्तावांमध्ये १२ लाख रुपयांपर्यंतच्या वार्षिक उत्पन्नावर कराचा बोजा पडणार नाही, तर सुधारित स्लॅबमुळे त्यापेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्यांना फायदा होणार आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी शनिवारी सादर केलेल्या अर्थसंकल्पात हे बदल करण्यात आले आहेत.

अर्थसंकल्पाची घोषणा करताना अर्थमंत्र्यांनी सांगितले की, १२ लाख रुपये वार्षिक उत्पन्न असलेल्या करदात्यांना ८०,००० रुपये आणि १८ लाख रुपये उत्पन्न असलेल्या करदात्यांना नवीन स्लॅबअंतर्गत ७०,००० रुपयांचा फायदा मिळेल. तसेच त्यांना ७५,००० रुपये स्टँडर्ड डिडक्शनचा अतिरिक्त लाभ मिळणार आहे. करसवलत देण्यासाठी केंद्र सरकार प्रत्यक्ष करातून एक लाख कोटी रुपये आणि करप्रस्तावांवर आधारित २,६०० कोटी रुपयांच्या महसुलावर पाणी सोडणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

वार्षिक १२ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असणाऱ्यांना नव्या व्यवस्थेनुसार कोणताही प्राप्तिकर भरावा लागणार नाही. त्यात ७५,००० रुपयांची स्टँडर्ड डिडक्शन जोडली जाईल आणि १२.७५ लाख रुपयांपर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या करदात्यांना शून्य कर भरावा लागेल. नव्या रचनेमुळे मध्यमवर्गीयांचे कर मोठ्या प्रमाणात कमी होतील आणि त्यांच्या हातात अधिक पैसा शिल्लक राहील. त्यातून घरगुती वापर, बचत आणि गुंतवणुकीला चालना मिळेल, असा विश्वास सरकारने व्यक्त केला आहे.

**नवी कर प्रणाली :**

- ४ लाख रुपयांपर्यंत ........ ०%
- ४-८ लाख रुपये ........ ५%
- ८-१२ लाख रुपये ........ १०%
- १२-१६ लाख रुपये ........ १५%
- १६-२० लाख रुपये ........ २०%
- २०-२४ लाख रुपये ........ २५%
- २४ लाख रुपयांपेक्षा जास्त ........ ३०%

## विशेष संपादकीय

# करसवलतही, खर्चाचे आमिषही...!

कोणत्याही तडजोडीशिवाय किंवा निवडणुकीच्या दबावाखाली न जाता अर्थमंत्र्यांनी देशाचा अर्थसंकल्प सादर केला आणि देशभरात नानाविध पडसाद उमटले. लोकांच्या अमर्याद आशा-अपेक्षांना हा अर्थसंकल्प पुरा पडतो की नाही हे दिसेलच, मात्र हा अर्थसंकल्प वाईट नाही, एवढे नक्की सांगता येते. गेल्या दहा वर्षांमध्ये मध्यमवर्गाचे उत्पन्न वाढत होते; परंतु वाढणारे उत्पन्न प्राप्तिकरात जात होते. त्यामुळे हा वर्ग काहीसा नाराज झाला होता. लवकरच दिल्ली आणि नंतर बिहार विधानसभेची निवडणूक आहे. त्यामुळे आपल्या पाठिराख्या मध्यमवर्गाला एकीकडे खूश करायचे आणि त्याला त्याच्या आवडीच्या गोष्टीत मोठ्या प्रमाणात खर्च करायला लावायचा, ही नीती अर्थसंकल्पात वापरण्यात आली आहे. मोठ्या प्रमाणात खर्च करणारा हाच घटक देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात हातभार लावत असतो. इतर घटकांपेक्षा या घटकांच्या हातून होणारी उलाढाल मोठी असते. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात होणाऱ्या वाढीबरोबरच करातून वाचणारा पैसा बाजारात कसा येईल, याची तजवीज करण्यात आली. त्यासाठी ईव्ही वाहने, मोबाईल, टीव्हीचे सुटे भाग स्वस्त करताना मोठे टीव्ही मात्र महाग करून ठेवले. पूर्वीच्या तीन लाख रुपयांच्या करमुक्त मर्यादेच्या तुलनेत आता चार लाखांचे उत्पन्न करमुक्त असेल. त्याव्यतिरिक्त गृहकर्ज, मेडिक्लेम, ठराविक गुंतवणुकीवर १२ लाखांपर्यंतच्या कमाईवर नोकरदारांना छदामही भरावा लागणार नाही. पुढे जो काही कर द्यावा लागेल, तो सवलत, सुटीच्या माध्यमातून पुन्हा वसूल करता येईल.

एकंदरीत, पूर्वी सात लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त होते. ते आता १२ लाख रुपयांपर्यंत झाले आहे. प्रमाणित वजावटी विचारात घेऊन ही सवलत असेल. तज्ज्ञांच्या मते वाचलेला हा पैसा पुन्हा बाजारात फिरेल, तो बँकेत गुंतवला जाईल अथवा नोकरदार वर्ग ही बचत बाजारात खर्च करेल. त्यामुळे सुस्तावलेल्या अर्थव्यवस्थेला गती मिळेल आणि विकसीत भारतासाठी मोठा वृद्धीदर गाठणे सोपे होईल. केंद्र सरकारने आज तिसऱ्या कार्यकाळातील दुसरा पूर्ण अर्थसंकल्प मांडला. या अर्थसंकल्पातून सरकारने अनेक मोठ्या घोषणा केल्या. केंद्र सरकारने बजेटमधून गोरगरीबांना दिलासा देण्याचे काम केले आहे. तसेच शेतकरी, महिला आणि नोकरदारांसाठी या बजेटमधून मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत. एवढेच नव्हे तर, रुग्णांसाठीही केंद्र सरकारने आपले हात मोकळे केले आहेत. केंद्र सरकारने एक दोन नव्हे तर, गंभीर आजारावरील ३६ औषधे करमुक्त केली आहेत. त्यामुळे ही औषधे स्वस्तात मिळणार आहेत. सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये कॅन्सर डे केअर सेंटर बनवण्याचा निर्णयही केंद्र सरकारने घेतला आहे. कॅन्सरवरील उपचारासाठीची औषधे आता स्वस्त होणार आहेत. सहा जीवनरक्षक औषधांवरील सीमा शुल्क पाच टक्के करण्यात आले आहे. अर्थसंकल्पातून विमा क्षेत्रासाठी काही चांगल्या तरतुदी समोर आल्या. अर्थमंत्र्यांनी देशातील विमा क्षेत्रातील गुंतवणूक परकीय गुंतवणूकदारांसाठी खुली करताना ही रक्कम भारतातच वापरण्याचे बंधन घातले आहे. त्यामुळे आरोग्य विमा क्षेत्रात स्पर्धा होणार असली, तरी आरोग्य विमा जीएसटीमुक्त करण्याची मागणी मात्र विचारात घेतली गेली नाही. या सरकारने कृषीसह सर्वच क्षेत्रांमध्ये 'एआय' तंत्रज्ञान वापरण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. वैद्यकीय शिक्षणाच्या जागा कमी असल्यामुळे विद्यार्थी या शिक्षणापासून वंचित राहतात. आर्थिक स्थिती चांगली असलेली मुले खासगी मेडिकल कॉलेजमध्ये शिकतात; मात्र गरीब कुटुंबातून आलेली मुले वेगळ्या क्षेत्रात जातात. आता सीतारामन यांनी मोठा दिलासा दिला आहे. त्यांनी येत्या पाच वर्षांमध्ये वैद्यकीयच्या दहा हजार जागा वाढवणार असल्याची घोषणा केली आहे. विद्यार्थ्यांसाठी ही मोठी गोष्ट ठरणार आहे. या विद्यार्थ्यांना सरकारी वैद्यकीय कॉलेजमध्ये शिक्षण मिळणार आहे.

**सोलापूर :** देशाला सर्वाधिक महसूल आणि कर देणाऱ्या महाराष्ट्राच्या तोंडाला केवळ पाने पुसण्याचे काम या सरकारने केले आहे. महाराष्ट्रासाठी या अर्थसंकल्पात कोणतीही भरीव तरतूद नाही. पण बिहारच्या आगामी निवडणूक पाहता त्या राज्यासाठी विशेष तरतुदी केल्याचे अधिक दिसत आहे. त्यामुळे हा आर्थिक नव्हे तर राजकीय अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे सोलापूर येथील प्रदेश प्रवक्ता काकासाहेब कुलकर्णी यांनी केंद्रीय अर्थसंकल्पावर दिली आहे.

## अकलूजमध्ये एफ एम प्रक्षेपक केंद्र स्थापनेसाठी

# केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांची मागणी

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** नुकतेच प्रसार भारतीने भारतभर एफ एम स्टेशन स्थापित करण्याची घोषणा केली आहे.त्या अनुषंगाने माढा लोकसभा मतदारसंघातील अकलूज शहरात एफ.एम. प्रक्षेपक स्थापित करण्याच्या मागणीसंदर्भात सुचना आणि प्रसारण (प्रसार भारतीचे) केंद्रीय मंत्री ना.अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली.

अकलूज शहरात दूरदर्शन रिले सेंटर (५०० वॅट) कार्यरत होते. अकलूज शहर हे दूरदर्शन सेंटर डी.एम.सी. सोलापूर (महाराष्ट्र) याच्या अधीन काम करत आहे. येथे दुरदर्शनचे साहित्य आणि टॉवर (मिनार) उपलब्ध आहे, ज्यातील एक एफ एम प्रक्षेपकासाठी राखीव ठेवले गेले आहे. यासर्व गोष्ट लक्षात घेऊन अकलूजमध्ये १ कि. वॅट किंवा १०० वॅट एफ एम प्रक्षेपक स्थापित करण्यास मान्यता द्यावी यामुळे पूर्ण मतदारसंघाला फायदा होईल अशी मागणी खासदार मा.धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली. अकलूज आणि आसपासच्या पाच तालुक्यातील एकत्रित लोकसंख्येचा अंदाज १५ लाख आहे. जर अकलूजमध्ये १ कि. वॅट एफ एम प्रक्षेपक कार्यरत झाला तर, सर्वाधिक शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल. लोकांना आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, मनोरंजन, राजकीय तसेच पंतप्रधानांच्या मन की बात' सारखी महत्त्वाची माहिती मिळू शकेल. अकलूज एफ एम प्रक्षेपक असल्यास ५० किमी अंतरातील पाच तालुक्यातील शेतकऱ्यांना त्याचा मोठा फायदा होईल. शेतकऱ्यांना रेडिओद्वारे अधिक माहिती मिळाल्यास त्यांना फायदेशीर ठरू शकते. तसेच, पंतप्रधानांच्या 'मन की बात' चा सुमारे १५ लाख लोकांना लाभ मिळू शकतो. या सर्व गोष्टीं खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केंद्रीय मंत्र्यांना निदर्शनास आणून देत एफ.एम स्टेशन उभा करावे म्हणून मागणी केली.

## रिक्षातून प्रवास करताना दीड लाखाचे दागिने लांबवले

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**सोलापूर :** रिक्षातून प्रवास करताना आधीच बसलेल्या एका महिलेने दीड लाखाचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना बुधवारी घडली. याबाबत राधा एकनाथ चौधरी (वय 51 राहणार यशराज नगर अक्कलकोट रस्ता) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात महिलेविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. अनोळखी महिलेने फिर्यादी महिलेच्या पर्समधून ठेवलेले सोन्याचे दागिने असलेली डबी नकळत काढून घेतली. यामध्ये 45 ग्रॅम सोन्याचे गंठण, चार ग्रॅमचे सोन्याचे कानातील टॉप्स अशा एकूण 1 लाख 47 हजार रुपयांच्या दागिन्यांचा समावेश आहे.

## 'वंचित'चे करमाळा एसटी आगारा विरोधातील आंदोलन स्थगित



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**करमाळा :** तालुक्यातील रावगाव येथे स्टेरिंग रोड तुटून एसटी उलटली होती. त्यामधील अपघातग्रस्तांसाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने यशपाल कांबळे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन झाले होते. त्याची दखल न घेतल्याने पुन्हा आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. त्यातूनच एसटी आगार प्रमुखांच्या पुतळ्याला दे धक्का आंदोलन केले जाणार होते. मात्र प्रशासनाकडून मागण्यापुर्ण करण्याबाबत लेखी आश्वासन दिले आहे. त्यामुळे आंदोलन स्थगित करण्यात आले आहे, असे कांबळे यांनी सांगितले आहे.

## Selected

## खोऱ्याने मारून शेतकऱ्याचे डोके फोडले

**सोलापूर :** लोखंडी खोऱ्याने मारून एका तरुण शेतकऱ्याचे डोके फोडण्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील दर्गनहळ्ळी येथे 29 जानेवारी रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास घडली. याबाबत रोहित विश्वनाथ कोरे (वय 32, रा. दर्गनहळ्ळी ता. दक्षिण सोलापूर ) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार रविकांत लिंबन्ना कोरे ( वय 40) याच्याविरोधात वळसंग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. रोहित कोरे यांनी रविकांत कोरे याला पाईपलाईन का फोडली अशी विचारणा केल्यानंतर संतप्त झालेल्या रविकांतने रोहित यांच्या डोक्यात खोऱ्या मारून त्यांचे डोके फोडले.

## पाटील व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात भेट



**करमाळा :** आमदार नारायण पाटील यांनी मंत्र्यांच्या भेटीगाठी सुरु केल्या आहेत. तालुक्यातील विकास कामाबाबत निधी मिळवण्याच्या दृष्टीने त्यांनी या भेटी घेतल्या आहेत. मात्र त्यांच्या भेटींनी राजकीय वर्तुळात चर्चा सुरु झाल्या आहेत. आमदार पाटील हे शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे आहेत. राज्यात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली सरकार कार्यकर्त आहे. त्यात पाटील हे विरोधी पक्षाचे आमदार आहेत. त्यामुळे विकासाला अडथळा निर्माण होईल, अशी चर्चा आहे. मात्र आमदार पाटील यांनी विकासासाठी मंत्र्यांच्या भेटी सुरु केल्या आहेत.

## सहकार शिरोमणी कारखान्याच्या मयत ऊस तोडणी वाहतुकादाराचे वारसास चेक प्रदान

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**भाळवणी :** सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याचे ऊस तोडणी मजुर रोहिदास किसन पवार यांचा अपघाती मृत्यु झाल्यामुळे त्यांच्या वारस पत्नी शिला रोहिदास पवार यांना रुपये तीन लाखाचा चेक कारखान्याचे व्हा.चेअरमन भारत कोळेकर यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी कारखान्याचे प्र.कार्यकारी संचालक पोपट घोगरे, डेप्यु.जनमॅनेजर, कैलास कदम, टेक्निकल जनरल मॅनेजर पी.टी.तुपे, प्रोडक्श्न मॅनेजर व्ही. डी.आडत, चिफ अकौंटंट बबन सोनवले, शेती अधिकारी पी.आर. थोरात, हेड टाईम किपर संतोष काळे उपस्थित होते.

कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे व मा.संचालक मंडळ यांनी ठरविलेल्या धोरणानुसार कारखान्याचे सर्व सभासद, ऊस तोडणी शेतमजुर, वाहतुकदार इत्यांदीच्या हिताचा विचार करुन, दुर्देवाने अपघात होवुन, मयत झालेल्या कुंटुंबियांना आर्थिक मदत मिळावी, त्यांचे कुटुंब उघड्यावर पडू नये, यासाठी दरवर्षी कारखान्यामार्फत सभासद, कामगार, ऊस वाहतुकदार, ऊस तोडणी शेतमजुर, बैलजोडी, झोपडी इत्यादींचा अपघात विमा दि न्यु.इंडिया इन्श्युरन्स कंपनी यांचेकडून उतरविण्यात येत असून, सदर विमा हप्त्याची रक्कम कारखान्यामार्फत भरण्यात येते.

मागील गळीत हंगाम 2023-24 मध्ये देऊळगांव जि.बुलढाणा येथील ऊस तोडणी मजुर रोहिदास किसन पवार यांचा अपघाती मृत्यु झालेला होता. अपघात झालेल्या तोडणी मजुरांचे कुटुंबियांकडून विमाक्लेमसाठी आवश्यकत्या कागदपत्रांची पुर्तता व सतत विमा कंपनीकडे पाठपुरावा करुन कारखान्याने विमाक्लेम सादर केला होता. सदर मंजुर झालेल्या विमाक्लेमची रक्कम रुपये तीन लाखाचा चेक मयत वारसाचे पत्नी शिला रोहिदास पवार यांना प्रदान करण्यात आला. यावेळी ऊस तोडणी मजुर, वाहतुक ठेकेदार बाळु शिंदे, शिवाजी साळुंखे, रामचंद्र मोरे, सभासद, शेतकरी कार्यकर्ते नारायण शिंदे, शालीवान कोळेकर, कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## निवड....

पंढरी संचार छायाचित्र सेवा




**करमाळा :** कंदर ता.करमाळा येथील शिवम संतोष नीलकंठ याची १४ वर्षाखालील महाराष्ट्र क्रिकेट टीममध्ये निवड झाली आहे.शिवम हा डावखुरा स्वींग वेगवान गोलंदाज म्हणुन नावारुपाला येत आहे. याप्रसंगी त्याचे अभिनंदन करण्यात आले. याप्रसंगी मान्यवर उपस्थित होते.

## वेगवान मोटारसायकलची जोरदार धडक वृद्धाचा मृत्यू



**बार्शी :** शेळगाव ते सोलापूर रस्त्यावर संकेत ढाब्याजवळ भरधाव मोटारसायकलच्या धडकेत 75 वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या प्रकरणी वैराग पोलीस ठाण्यात मोटारसायकल चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. फिर्यादी आप्पासाहेब गंगाराम चव्हाण (वय 46, व्यवसाय-मजुरी, रा. गावडी दारफळ, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर) यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या वडिलांना भरधाव आणि निष्काळजीपणे चालवलेल्या मोटारसायकलने जोराची धडक दिली.

## मोहोळ तालुक्यातील 56 शाळा झाल्या सुरक्षित



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** राज्यभरातील विद्यार्थीनींच्या संदर्भात घडलेल्या वाईट घटनांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद शाळेच्या पालकांनी शाळेच्या परिसरात सीसीटीव्ही बसवण्याची सातत्याने मागणी केली होती. त्या मागणीची दखल घेत सोलापूर जिल्हा नियोजन समितीकडून मिळालेल्या निधीतून सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षण विभागाने मोहोळ तालुक्यातील 56 शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविले असून यामुळे विद्यार्थ्यांसाठी सुरक्षितता निर्माण झाली आहे.

## गावठाण हद्दीत राहणाऱ्या घरकुल लाभार्थ्यांना राहत्या जागेवर घरकुल बांधण्यास परवानगी द्यावी



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** मोहोळ तालुक्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना व रमाई आवास योजनेअंतर्गत अनेक गरजू लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झालेले आहे परंतु सदर लाभार्थ्यांकडे मालकी हक्काची जागा नसल्यामुळे त्यांना घरकुल योजनेचा लाभ घेण्यास अडचण निर्माण होत आहे, त्यामुळे बऱ्याच गरजू लाभार्थ्यांची घरकुले रद्द होत आहेत त्यामुळे ग्रामपंचायतच्या गावठाण हद्दीमध्ये राहणाऱ्या लाभार्थ्यांना गावठाण हद्दीतील राहत्या जागेवर घरकुल बांधण्यास परवानगी मिळावी व ज्यांच्याकडे जागा नाही अशा लाभार्थ्यांना गावठाण हद्दीतील जागा उपलब्ध करून द्यावी असे निवेदन पेनूरचे ग्रामपंचायत सदस्य रामदास चवरे यांनी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांना दिले.

## 'सीएमओ'च्या फोननंतर मालमत्ता जप्तीची कारवाई टळली?



**करमाळा :** करमाळा तालुक्याच्या राजकारणात प्रमुख गटापैकी असलेला बागल गट विधानसभा निवडणुकीपासून सावरत असतानाच धाराशिव जनता सहकारी बँकमुळे पुन्हा चर्चेत आला आहे. गेल्या आठवड्यात या बँकेच्या पथकामुळे तहसील परिसरात उलटसुलट चर्चा रंगल्या होत्या. थकीत कर्ज वसुलीप्रकरणात या बँकेने मालमत्ता ताब्यात घेण्याची कारवाई केली. मात्र करमाळ्यातील मालमत्ता ताब्यात घेताना 'सीएमओ'चा (मुख्यमंत्री कार्यालय) फोन आल्याने पुढील कारवाही टळली, अशी चर्चा आहे.

## सोन्याच्या दागिन्यांची चोरी गुन्हा दाखल



**बार्शी :** एका घरातून तब्बल 2, 01, 600/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी फिर्यादी प्रिया अक्षय गाढवे यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. त्यांचे पती आडत दुकान चालवतात. त्यांचे घर तीन मजली असून, तीसऱ्या मजल्यावर त्या पती आणि मुलांसह राहतात. सोन्याचे दागिने घालून ठेवले होते. दागिने काढून कपाटातील दागिन्याच्या बॉक्समध्ये ठेवले, मात्र कुलूप लावले नव्हते. दागिने घालण्यासाठी कपाट उघडले असता, त्यांना सर्व दागिने गायब झाल्याचे लक्षात आले.




## आमदार समाधान आवताडे यांच्या प्रयत्नांना यश

# तालुका न्यायालयाच्या आवारात लॉयर्स हॉल साठी २ कोटी ७० लाख निधी मंजूर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मंगळवेढा :** पंढरपूर तालुका न्यायालयाच्या आवारात लॉयर्स हॉल उभारण्यासाठी १३४.७५ लाख रुपये निधीची याचबरोबर मंगळवेढा तालुका न्यायालयाच्या आवारात लॉयर्स हॉल बांधण्यासाठी १३५.९९ लाख रुपये निधीच्या तरतुदीस शासन निर्णयाद्वारे शासकीय मान्यता देण्यात आली आहे. पंढरपूर आणि मंगळवेढा येथील वकील मंडळींनी अधिवक्ता संघाच्या वतीने लॉयर्स हॉल उभारण्यात यावे अशी मागणी पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्याकडे केली होती. मतदार संघातील पंढरपूर, मंगळवेढा या दोन्हीही तालुक्यात लॉयर्स हॉल उभारण्यात यावे.

यासाठी आमदार समाधान आवताडे यांनी शासन दरबारी सतत पाठपुरावा करून निधी मंजूर केला आहे.

पंढरपूर आणि मंगळवेढा तालुका न्यायालयाच्या आवारात लायर्स हॉल बांधण्याचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी शासनास सादर केला होता. सदर प्रस्ताव प्रशासकीय मान्यता मिळवण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, ना.अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्यातून आमदार समाधान आवताडे यांनी शासन दरबारी सतत पाठपुरावा करून पंढरपुर आणि मंगळवेढा येथे तालुका न्यायालयाच्या आवारात लॉयर्स हॉल बांधण्यासाठी निधीची तरतूद करून घेतल्याने याचा फायदा वकील मंडळी आणि न्यायासाठी दाद मागणाऱ्या सामान्य नागरिकांना होणार असल्याने वकील मंडळी आणि नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

पंढरपूर आणि मंगळवेढा तालुक्यात लॉयर्स हॉल साठी २ कोटी ७० लाख निधीची तरतूद मतदार संघातील पंढरपूर आणि मंगळवेढा तालुका आवारात लॉयर्स हॉल बांधण्यासाठी आमदार समाधान आवताडे यांनी सतत शासन दरबारी सतत पाठपुरावा करून दोन्ही तालुक्यातील लॉयर्स हॉल बांधण्यासाठी २ कोटी ७० लाख निधी मिळवल्याने वकील मंडळी आणि सामान्य नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे. लॉयर्स हॉल बांधण्यासाठी निधी मंजूर झाल्यामुळे आ. समाधान आवताडे यांच्या कामकाजाची सर्वत्र कौतुक होत आहे.

**सोलापूर :** दुचाकीवरून जात असलेल्या पती-पत्नीला पाठीमागून कार चालकाने दिलेल्या धडकेत पत्नीचा गंभीर जखमी होऊन मृत्यू झाल्याची घटना बुधवारी सायंकाळी पावणेपाच वाजण्याच्या सुमारास कलेक्टर बंगल्याजवळील रस्त्यावर घडली. या घटनेत पल्लवी प्रफुल्ल दळवी (वय 69 राहणार सोलापूर) ही वृद्ध महिला मयत झाली. याप्रकरणी प्रफुल्ल भालचंद्र दळवी (वय 72, राहणार दत्तनगर सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार किरण कांबळे या कारचालकावर सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

## स्वेरीमध्ये दुसरा पदवीप्रदान समारंभ उत्साहात संपन्न

# शिकण्यात एकलव्यासारखी एकाग्रता हवी -पद्मश्री डॉ. संजय धांडे


■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** 'आपण एकलव्यासारखे विद्यार्थी व्हा. खूप सराव केल्यावर आपल्या कार्यात एक्स्पर्ट होता येते. सकारात्मकता, गुणवत्ता, अचूकता, एकाग्रता ही कोणत्याही विद्यापीठात शिकवली जात नाही तर या बाबी स्वतः आत्मसात कराव्या लागतात. कठोर परिश्रम केल्यानंतर मिळालेल्या यशाचा आनंद हा दीर्घकाळ टिकतो. आपण कोणतेही कार्य हाती घ्या मात्र त्या कार्यात उत्सुकता आणि जिज्ञासा असावी. एकलव्याने मातीच्या पुतळ्याला प्रत्यक्ष गुरु मानून धनुर्विदयेचे शिक्षण घेतले. आपण देखील आपल्या शिकण्यात एकलव्यासारखी एकाग्रता साधावी.' असे प्रतिपादन आय.आय.टी., कानपूरचे माजी संचालक व पद्मश्री किताबाने सन्मानित शिक्षणतज्ज्ञ प्रा. डॉ. संजय धांडे यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचालित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस), कॉलेज ऑफ फार्मसी व कासेगाव (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल इन्स्टिट्यूट ऑफ प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन संचलित इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर अँड मॅनेंजमेंट स्टडीज् च्या वतीने हा संस्थास्तरीय दुसरा दिक्षांत समारंभ संपन्न झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून आय.आय.टी., कानपूरचे माजी संचालक व पद्मश्री अवार्ड विजेते डॉ. संजय धांडे हे बोलत होते. विशेष अतिथी म्हणून आय.सी.टी. महाविद्यालयाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ. भास्कर थोरात हे होते. महाराष्ट्र गीत, विद्यापीठ गीत आणि स्वेरी गीतानंतर प्रास्ताविकात स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी. रोंगे यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समृद्धता साधण्यासाठी १९९८ साली स्थापन केलेल्या स्वेरीची पार्श्वभूमी सांगितली. ते म्हणाले, 'स्वेरीत सध्या संशोधनाचे वातावरण तयार झाले असून याद्वारे प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसित होत आहे. सकारात्मक विचारसरणीमुळे संस्थेत प्रगती होताना दिसत आहे'. असे सांगून विद्यार्थी दशेतच आपले ध्येय ठरवा व त्या दिशेने झेप घ्या असे आवाहन त्यांनी केले. विशेष अतिथी डॉ.थोरात म्हणाले की, 'उद्योजक होण्यासाठी मोठे असावेच असे नाही, लहान असले तरी चालते. फक्त परिश्रम करण्याची जिद्द अंगी असावी. नेतृत्व तेंव्हाच करता येईल जेंव्हा आपल्या विचारात परीपक्वता असेल. कठोर परिश्रम, वेळेचे बंधन, अचूकता, कमतरता दूर करणे असे विविध प्रश्न विद्यार्थ्यांना पडले पाहिजेत. आजूबाजूचे वातावरण, जागतिक बाजारपेठ, चिकाटीपणा, दूरदृष्टिकोन आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे शिकण्याची इच्छा असावी लागते तरच आपल्याला नेतृत्व करता येईल. मोठे स्वप्न बघा आणि त्याचा पाठपुरावा करा. मोठमोठ्या उद्योजकांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवा. त्यामुळे आपल्याला प्रेरणा मिळते.' असे सांगून त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महाराणा प्रताप, शके बाराशे ते पंधराशे दरम्यानचे संत, अश्विन जोशी, अश्विनी डहाणे, मुकेश अंबानी, अंजली रेड्डी, कृष्णा इलाई आदी उदाहरणे देऊन जीवनात यशस्वी होण्यासाठी परिश्रमाची गरज आहे हे पटवून दिले.' यावेळी सन २०२३-२४ मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना इंजिनिअरिंग, एम.बी.ए., एम.सी.ए., बी.फार्मसी, एम. फार्मसी तसेच आय.सी. एम.एस. मधील विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे आणि अंतिम सत्र परीक्षेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत आलेल्या प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण व सुवर्णपदक विजेत्या विद्यार्थ्यांचा पाहुण्यांच्या हस्ते पदक, प्रमाणपत्र देवून विद्यार्थ्यांच्या पालकांसहीत सन्मान करण्यात आला. पदवीप्रदान समारंभ प्रसंगी इमारतीच्या प्रवेशद्वारापासून ते मुख्य रंगमंचापर्यंत परीक्षा विभागाचे स्वेरीचे नियंत्रक डॉ. एस.ए.लेंडवे यांच्या नेतृत्वाखाली ज्ञानदंडाची मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणूकीमध्ये सर्व मान्यवर, संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, इंजिनिअरिंगच्या बी. फार्मसीचे प्राचार्य, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, पदवीधर व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी सौ. मेधा धांडे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त एन.एस. कागदे, संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त धनंजय सालविठ्ठल, विश्वस्त एच.एम.बागल, विश्वस्त बी.डी.रोंगे, युवा विश्वस्त प्रा. सुरज रोंगे, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी. मणियार, इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व पालक आदी उपस्थित होते. प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

## बेकायदेशीर शस्त्र बाळगणारे ५ जण अटकेत




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** नातेपुते पोलिस हद्दीमध्ये असलेल्या मार्केट यार्ड येथील रत्नप्रभा कन्याशाळे समोरील बाजार समितीजवळ शस्त्र बाळगणाऱ्या पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. अल्ताफ अखिर आत्तार (रा. नातेपुते), सूरज दिलीप वाघमारे (रा. तीन कॉलनी चाळ, वालचंदनगर, ता इंदापूर), अनिकेत महिंद्र रणशिंग, निखिल तानाजी हुलगे (दोघे रा. रणगाव, ता. इंदापूर), अनिल मारुती कारंडे (रा. निमसाखर, ता. नातेपुते पोलीस ठाणे इंदापूर) असे त्या आरोपींची नावे आहेत. याबाबत रणजीत मदने यांनी फिर्याद दिली आहे. अधिक तपास पोलिस फौजदार सत्यवान पाटकुलकर करीत आहेत.

## » Selected

## तृतीयपंथीयांचे प्रश्न समाजापुढे आले पाहिजेत



**सोलापूर :** तृतीयपंथीयांचे जगणं हे परिघाबाहेरचं जगणं आहे. आमचे प्रश्न आमच्यापुरतेच सीमित असतात. ते समाजापुढे आले पाहिजेत. आमचे दुःख तुमच्या सारखेच आहे. आम्हालाही समाजामध्ये जगायचे आहे. आम्हालाही समाजाने समजून घेतले पाहिजे. आमची प्रगती होण्यासाठी समाजाने व शासनाने आम्हाला मदत केली पाहिजे. त्यासाठी आमचे रोजगार, आरोग्य व नोकरीचे प्रश्न सोडविले गेले पाहिजेत असे मत वनरक्षक म्हणून कार्यरत असलेल्या तृतीयपंथीय विजया वसावे यांनी व्यक्त केले. सोलापूर विद्यापीठाने आयोजित केलेल्या तृतीयपंथीयांच्या परिषदेवेळी त्या बोलत होत्या.

## विवाहितेचा विनयभंग; दोघांविरुद्ध गुन्हा



**मोहोळ :** विवाहिता शेतातील बांधलेली जनावरे आणण्यास गेल्यावर एकटीला पाहून तिच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केल्याप्रकरणी गणेश दगडू बिचुकले, नारायण गंगाधर बिचुकले या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पती गावातील दूध गोळा करण्यासाठी गेल्याने सायंकाळी साडेपाच वाजता फिर्यादी ही शेतात बांधलेली जनावरे आणण्यासाठी एकटीच गेली होती. जनावरे घेऊन घराकडे जात असताना आरोपीने मनाला लज्जा येईल असे कृत्य केल्याचे फिर्यादित म्हटले आहे.

## ५८ हजार शेतकऱ्यांनी पोस्टात सुरू केले खाते




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** बँकेमध्ये गेल्यानंतर विविध अडचणी येत असल्यामुळे यामुळे वेळ व पैसा वाया जात आहे म्हणून शेतकऱ्यांनी आता पोस्ट कार्यालयात खाते उघडण्यास सुरुवात केली आहे पंढरपूर तालुक्यातील 58 हजार 700 शेतकऱ्यांनी पोस्टात नवीन खाती उघडली आहेत आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पीएम किसान योजना सुरू केली आहे या अंतर्गत शेतकऱ्यांना वर्षाला सहा हजार रुपये बँक खात्यात जमा करण्यात येत आहेत अनेक शेतकऱ्यांनी बँकेत कागदपत्रे दिली आहेत तरीही बँकेकडून त्रुटी काढण्यात येत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या बँक खात्यात रक्कम जमा होत नाही यामुळे शेतकऱ्यातून तीव्र संताप व्यक्त होत आहे पी एम किसान योजनेचा हप्ता पोस्ट खात्यातही जमा करण्यात येईल असे केंद्राने जाहीर केले आहे यामुळे शेतकऱ्यांचा कल आता पोस्ट कार्यालयात खाते उघडण्याकडे वाढला आहे सोलापूर जिल्ह्यात नोव्हेंबर मध्ये चार लाख 93 हजार शेतकऱ्यांनी पोस्ट कार्यालयात खाते उघडली होती यात वाढ होऊन जानेवारीमध्ये पाच लाख तीन हजार शेतकऱ्यांची संख्या झाली आहे तर पंढरपूर तालुक्यात नोव्हेंबर महिन्यात 57 हजार 70 शेतकऱ्यांनी खाती उघडली होती यात वाढ होऊन आता 58,700 खाती झाली आहेत शेतकऱ्यांचा कल पोस्ट खात्याकडे वाढत असल्याचे दिसून येत आहे

## एटीएम सेवा...

पंढरी संचार छायाचित्र सेवा




**कुर्डूवाडी :** सोलापूर जिल्ह्यातील व्यापारी बँक म्हणून ओळखले जाणारी पंढरपूर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक या बँकेच्या कुर्डूवाडी येथील शाखेमध्ये आज रोजी दिनांक 30 जानेवारी 2025 या दिवशी शुभ मुहूर्तावर पंढरपूर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन शितल तंबोली यांच्या शुभहस्ते एटीएमची सुविधा सुरू करण्यात आली आहे. अशी माहिती पंढरपूर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेचे सर्व व्यवस्थापक अतुल म्हमाने यांनी दिली.

**सोलापूर :** आज श्री गणेश जयंती निमित्त सोलापूर शहरात सर्वत्रच विविध धार्मिक विधी, पाळणा सोहळा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. याच पार्श्वभूमीवर गुलमोहोर सोसायटी वसंत विहार येथे श्री गणेश मंदिरात आकर्षक मंडप, फुलांनी विशेष सजावट करण्यात आली होती. सकाळच्या सत्रात अशोक चंदन व त्यांच्या पत्नी विद्या चंदन या दाम्पत्याच्या हस्ते होम हवन सोहळा पार पडला. यानंतर दुपारच्या सत्रात पाळणा महाआरती व भक्त भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गणेश भक्तांनी गणपती बाप्पा मोरयाचा जयघोष केला.

## सैनिक कुटुंबियांच्या संरक्षणाबाबत बैठक



**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातील सैनिक व माजी सैनिक यांच्या कुटुंबियांना संरक्षण देण्यासाठी पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांच्या अध्यक्षतेखाली 6 फेब्रुवारी रोजी सकाळी 11. 30 वाजता पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांच्या दालनात जिल्हास्तरीय समितीची बैठक आयोजित करण्यात आली आहे. तरी जिल्ह्यातील सर्व सैनिक व माजी सैनिकांनी आपल्या अडीअडचणी विषयक संपूर्ण दस्तवेज दोन प्रती मध्ये सोबत घेऊन पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांच्या दालनात सकाळी 11. 30 वा. उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी सोलापूर यांनी केले आहे.

**दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि. पंढरपूर**
**(महिला शाखा)**
**नोटीस**

आमचे बँकेचे मयत सभासद, ठेवीदार व कर्जदार भामा ग्यानू सर्वगोड रा. पंढरपूर या नावावर सेव्हिंग ठेव खाते असून सदर खात्याला वारस हक्काने नांव दाखल करणेबद्दल मयताचे वारसापैकी त्यांचा भाचा राम विठ्ठल सर्वगोड यांनी बँकेकडे विनंती अर्ज केला आहे. या विनंती अर्जाप्रमाणे अर्जदाराचे नांव वारस हक्काने दाखल करणेस अन्य वारसांनी लेखी संमत्या दिलेल्या आहेत. तरी सदर मयतास अर्जदार यांनी अर्जात नमुद केले व्यतिरिक्त अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्युपत्र चालविणारे वगैरे कोणी असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध केले तारखेपासून सात दिवसाचे आत बँकेकडे लेखी कळवावे. सदर मुदतीत कोणाची कसल्याही प्रकारची लेखी तक्रार न आल्यास अर्जदार यांनी अर्जात नमुद केले व्यतिरिक अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्युपत्र चालविणारे वगैरे कोणी नाहीत असे समजून मयताचे नावावरील वर नमुद केलेल्या सेव्हिंग ठेव खात्यास अर्जदार राम विठ्ठल सर्वगोड यांचे नांव वारसहक्काने दाखल करणेत येईल. मागाहून कोणाची कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. कळावे!

**पंढरपूर**
**तारीख - ०१/०२/२०२५**
सही/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**दि पंढरपूर अर्बन को-ऑप बँक लि., पंढरपूर**
**( महिला शाखा)**

**दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि. पंढरपूर**
**(महिला शाखा)**
**नोटीस**

आमचे बँकेचे मयत सभासद, ठेवीदार व कर्जदार सुभद्रा अर्जुन धुमाळ आणि अर्जुन गणपत धुमाळ रा. पंढरपूर या नावावर शेअर्स, सेव्हिंग खाते,मुदत ठेव असून सदर खात्याला वारस हक्काने नांव दाखल करणेबद्दल मयताचे वारसापैकी त्यांचा मुलगा सुधाकर अर्जुन धुमाळ यांनी बँकेकडे विनंती अर्ज केला आहे. या विनंती अर्जाप्रमाणे अर्जदाराचे नांव वारस हक्काने दाखल करणेस अन्य वारसांनी लेखी संमत्या दिलेल्या आहेत. तरी सदर मयतास अर्जदार यांनी अर्जात नमुद केले व्यतिरिक्त अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्युपत्र चालविणारे वगैरे कोणी असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध केले तारखेपासून सात दिवसाचे आत बँकेकडे लेखी कळवावे. सदर मुदतीत कोणाची कसल्याही प्रकारची लेखी तक्रार न आल्यास अर्जदार यांनी अर्जात नमुद केले व्यतिरिक अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्युपत्र चालविणारे वगैरे कोणी नाहीत असे समजून मयताचे नावावरील वर नमुद केलेल्या शेअर्स, सेव्हिंग खाते, मुदत ठेव खात्यास अर्जदार सुधाकर अर्जुन धुमाळ यांचे नांव वारसहक्काने दाखल करणेत येईल. मागाहून कोणाची कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. कळावे!

**पंढरपूर**
**तारीख - ०१/०२/२०२५**
सही/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**दि पंढरपूर अर्बन को-ऑप बँक लि., पंढरपूर**
**( महिला शाखा)**

**सहकारी शिरोमणी वसंतराव काळे सह.साखर कारखाना लि.**
चंद्रभागानगर,भाळवणी,ता.पंढरपूर,जि.सोलापूर मो.नं. ९२२६५९६८८४
**गळीत हंगाम बंद नोटीस**

कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक सभासद व बिगर सभासदांना कळविण्यात येते की, कारखान्याच्या चालू गळीत हंगाम २०२४-२५ करिता नोंदविलेल्या सर्व उसाचे गाळप जवळपास पूर्ण होत आलेले असून कारखान्याचा चालू गळीत हंगाम माहे फेब्रुवारी २०२५ च्या पहिल्या आठवड्यात बंद होणार आहे. तरी ज्या सभासद व बिगर सभासदांचा चालू गळीत हंगाम २०२४-२०२५ करिता कारखान्याकडे नोंदवलेला/करार केलेला गाळप पात्र ऊस रस्ता नसल्यामुळे किंवा तोडणी करण्यास अयोग ऊस अथवा अन्य कारणांमुळे गळीत करावयाचा शिल्लक राहिला असेल, अशा ऊस उत्पादक सभासदांनी शेती खात्याशी संपर्क साधून त्यांच्या पूर्व परवानगीने स्वतः तोडणी आणि वाहतूक करुन आपला ऊस गाळपासाठी वेळेत कारखान्यावर पोहोच करावा. वरील प्रमाणे कार्यवाही न केल्यामुळे ऊस गाळपा अभावी शिल्लक राहिल्यास, अशा शिल्लक उसाची कोणतीही जबाबदारी कारखान्यावर राहणार नाही व त्यांना या संदर्भात नुकसान भरपाई मागण्याचा हक्क राहणार नाही. याची कृपया सर्व संबंधित ऊस उत्पादकांनी नोंद घ्यावी.

**प्र.कार्यकारी संचालक**
**स्थळ-चंद्रभागानगर,भाळवणी**
**दि. ०१/०२/२०२५**

## चुकीचा विकास आराखडा रद्द करणार



**माळशिरस :** नातेपुते शहर विकास आराखडा रद्द करण्याबाबत चर्चा करून निर्णय घेणार. सर्वच नगरसेवक एकत्र येऊन हा आरक्षण आराखडा रद्द करण्यासाठी ठराव मंजूर करून खासदार, आमदार यांच्या माध्यमातून शासन दरबारी रद्द करण्याबाबत मागणी करणार आहोत. नातेपुते नगरपंचायत नागरिकांच्या बाजूने याअगोदरही आहे, यापुढेही असणार आहे. विकास आराखड्याबाबत गैरसमज करून घेऊ नये. यामध्ये लोकप्रतिनिधींचा कसलाही संबंध नसल्याचे मत माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक मालोजीराजे देशमुख यांनी व्यक्त केले.




## श्री दत्त विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय,सुस्ते प्रशालेचा

# ४५ वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व स्नेहसंमेलन संपन्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर:**श्रीदादासाहेबसोमदळेशिक्षणप्रसारकमंडळ,पंढरपूर संचलित,श्री दत्त विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय,सुस्ते प्रशालेचा 45 वा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ नुकतेच उत्साहात संपन्न झाले.कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून मोनिका सिंह (मॅडम) अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर तर अध्यक्षस्थानी लेखक,कीर्तनकार कवी सूर्याजी भोसले हे होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व सरस्वती पूजनाने प्रमुख पाहुण्या मोनिका सिंह मॅडम व सूर्याजी भोसले तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ.मदन क्षीरसागर,उपाध्यक्ष शिवाजी वाघ,सचिव अॅड.वैभव टोमके, सहसचिव अजित नडगिरे, खजिनदार सलीम वडगावकर ज्येष्ठ संचालक आप्पासाहेब चोपडे,दिलीप घाडगे,अनिरुद्ध सालविठ्ठल,विजयकुमार माळवदकर,सुनीता मोरे,प्रशालेचे प्राचार्य प्रा.सुधाकर पिसे,विवेकचे प्राचार्य उत्तरेश्वर मुंढे,पर्यवेक्षक रणजीत शिनगारे, ज्येष्ठ लिपिक राजकुमार ढगे,स्नेहसंमेलन प्रमुख नितीन वायदंडे व सरस्वती शिंदे, या मान्यवरांच्या शुभहस्ते व पालक, ग्रामस्थ यांचे उपस्थितीत संपन्न झाले. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी कलाविष्कार या कार्यक्रमांतर्गत नृत्य,गीत गायन,भारुड,अंधश्रद्धा निर्मूलन नाटिका,व्यसनमुक्ती पथनाट्य, देशभक्ति गीत,कोळी गीत, मनोरंजक बातम्या, शेतकरी नृत्य,आदिवासी नृत्य, भक्तीगीत, भावगीत, लोकगीत अशा विविध अंगी, विविध ढंगी सामाजिक प्रबोधनात्मक व वैचारिक स्वरूपाचे कलाविष्कार विद्यार्थ्यांनी सादर करुन उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलेला संस्था,प्रशाला व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी एच.एस.सी व एस एस.एस.सी परीक्षेत आणि इयत्ता ५ वी ते ९वी या इयत्तेत व विषयात व स्नेहसंमेलनानिमित्त बौद्धिक व कला-क्रीडा स्पर्धेत यश प्राप्त विद्यार्थ्यांना मान्यवरांचे शुभहस्ते रोख व वस्तू स्वरूपात पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. प्रशालेतील विद्यार्थ्यांनी इशस्तवन व स्काऊट गाईडच्या संचलनाने मान्यवरांचे स्वागत केले.प्रशालेतील विद्यार्थिनींनी लाठीकाठी, नॉनचोक व तलवारबाजीच्या प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची मने जिंकली. प्रमुख पाहुण्या मोनिका सिंह यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांनी दिवसाच्या 24 तासाच्या नियोजनात आठ तास झोप,आठ तास शाळा-अभ्यास व आठ तास स्वतः साठी म्हणजेच स्वतःचे छंद व आवड जोपासण्यासाठी सत्कारणी लावले पाहिजेत असा मोलाचा संदेश देऊन,

ख्वाबों की उड़ाने आसमान में कम नहीं, दिल ने यह ललकार की है, हम किसी से काम नहीं। दिए का उजाला चीरता है अंधकार को। आंधियों से लड़ते-लड़ते बुझने का भी गम नहीं। जाओ जाकर बोल देना दुश्मनों को आज तुम। हमको मत कमजोर समझो, हम वह पहले हम नहीं। दिल ने यह ललकार की है, हम किसी से कम नहीं। अशा आशयसंपन्न गझलेने आपल्या उद्बोधनपर मनोगताची सांगता केली. अध्यक्षीय भाषणातून कवी सूर्याजी भोसले यांनी माता पिता हे आपले घरातील पहिले गुरु असून शिक्षक हे सर्वव्यापी ज्ञानाने विद्यार्थ्यांची व्यक्तिमत्व घडवणारे शाळेतील गुरु आहेत.

पंढरी संचार


# आत्मविश्वास आणि स्वप्न देणारा 'फुटबॉल'

## एका स्पर्धात्मक खेळाच्या शिक्षणाने राजस्थानातील कुप्रथांना चाप

**इन्विक्ट्स (Invictus) हा गाजलेला हॉलीवूड चित्रपट इतिहासातील अत्यंत मान्यवर नेते नेल्सन मंडेला यांच्या आयुष्यातील एका वेगळ्याच कामगिरीवर होता. नेल्सन मंडेला २७ वर्षांच्या कारावासानंतर दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष झाले. तेव्हा राष्ट्रप्रमुख म्हणून अनेक आव्हाने त्यांच्यापुढे होती. जहाल आणि जळजळीत वर्णद्वेषातून कमी संख्येच्या उच्चभ्रू गौरवर्णी विरुद्ध अशिक्षित कृष्णवंशीय जनता अशा सामाजिक असमानतेने पोळलेला त्यांचा देश होता. या प्रखर वर्णभेदाला आणि त्या धोरणाला अपारटाइड (aparthied) अशी संज्ञा होती.**



मंडेला यांनी रग्बी या खेळातून सामाजिक समानता आणण्याचा अत्यंत अभिनव आणि यशस्वी प्रयोग केला होता. त्यांनी रग्बी खेळातील स्प्रिंगबॉक्सच्या गौरवर्णीय कॅप्टनला बोलवून त्याला १९९५चा रग्बी वर्ल्डकप दक्षिण आफ्रिकेच्या संघाने जिंकण्याची मनिषा व्यक्त केली. कॅप्टन फ्रांस्वा त्यामुळे प्रभावित झाला आणि त्या ध्येयाला गाठण्याचा त्याने मनोमन निर्धार केला. मंडेलांनी त्याला आफ्रिकेचे राष्ट्रगीत स्पर्धेला जातांना बस मध्ये लावायला मोठ्या खुबीने सांगितले. तसेच देशभरच्या कृष्णवंशीय मुलांना त्यांच्या संघाने ट्रेनिंग द्यावे असेही सुचवले. परिणामी, लहान लहान मुले देखील रग्बी खेळू लागली. आणि वर्ल्डकप जिंकायच्या ध्येयाने राष्ट्रीय टीम अधिक जोमाने प्रॅक्टिस करू लागली. मंडेलांच्या अनोख्या धोरण आणि धुरिणत्वाने दक्षिण आफ्रिकेचा संघ रग्बी वर्ल्डकप तर जिंकला. मुख्य म्हणजे वर्णभेदाची तीव्रता अतिशय कमी झाली आणि सामाजिक न्याय व समतेकडे त्यांचा देश दमदारपणे पाऊले टाकू लागला. नेल्सन मंडेळलांच्या रग्बी खेळाच्या प्रयोगासारखाच फुटबॉलच्या खेळातून मुलींच्या सक्षमीकरणाचा प्रयत्न राजस्थानात अजमेर जिल्ह्यात करण्यात आला.



क्रिडा
गायत्री चंदावरकर
पंढरी संचार

महिला जागरण समिती, नामक NGO ने या जिल्ह्यातील चार खेड्यातील लहान मुलींना फुटबॉल शिकवण्यास सुरुवात केली. २०१६ पासून २०२०-२१ पर्यंत ४०० हुन अधिक मुलींना फुटबॉल शिकवण्यात ही संस्था यशस्वी तर झालीच आहे. तसेच या उपक्रमातून राजस्थानातील बालविवाह या कुप्रथेला यशस्वी छेद दिला आहे.

या संस्थेने मुद्दाम फुटबॉल या खेळाची निवड केली कारण हा खेळ प्रामुख्याने पुरुष खेळतात आणि त्यामुळे साहजिकच त्यांचे या खेळावर पूर्ण वर्चस्व आहे. त्यामुळे, मुलींसाठी फुटबॉलची निवड करून त्यांनी स्त्री-पुरुष समानतेकडे मोठ्या धोरणीपणाने पाऊल उचलले. त्यासाठी त्यांनी वेगवेगळे क्लब्स सुरु केले. या क्लबसद्वारे मुलींसाठी त्यांनी अनेक वर्कशॉप्स घेतले. त्यामुळे मुलींना त्यांच्या हक्कांची जाणीव झाली. आनंदाची बाब म्हणजे मुली त्यांची उद्दिष्टे ठरवू लागल्या आणि स्वप्ने देखील बघायला शिकल्या.

सुरुवातील आईवडील मुलींना खेळायला पाठवत नसत. हळूहळू मुलीच आईवडलांना पटवून देऊ लागल्या. शॉर्ट्स घालून खेळायला सुरुवातीला त्यांचा विरोध असे. तेव्हा पंजाबी ड्रेस मध्ये त्या खेळत असत.

हळूहळू गुज्जर या उच्चवर्णीयच नव्हे तर इतर जातींतील मुली खेळायला येऊ लागल्या. मीणा समाजातील मुलीही खेळायला येऊ लागल्या. दलित मुलीही येऊ लागल्या. कनिष्ठ वर्णीय जातींतील मुलींना हात लावायचा नाही किंवा त्यांनी उच्चवर्णियांच्या बरोबर समानतेने वागायचे नाही अशा अन्याय्य गोष्टी या खेळामुळे पूर्णपणे बाद झाल्या हा प्रचंड मोठा बदल या चारही खेड्यातील मुलीच्याच नव्हे तर त्यांच्या पालकांतही झाला.





फुटबॉल पटू ममता गुज्जर तिच्या आई बरोबर

सुरुवातीला खेड्यातील मुले खेळायला जागा देत नसत, फुटबॉलची हवा काढून टाकत असत तसेच कुचेष्टा करत असत आणि खेळात व्यत्यय आणत असत. शेवटी सरपंचाकडे तक्रार केल्यावर हे सगळं थांबलं. आता मुलींची प्रगती पाहून या चारही खेड्यातील मुले देखील फुटबॉल खेळू लागली आहेत.

दरवर्षी, सांकरिया, मीनो का नया गाव आणि हासियावास या खेड्यातील मुली अजमेर शहरातील सुप्रसिद्ध मेयो कॉलेजात ट्रेनिंगला जातात. तसेच भारतातील विविध राज्यांतील स्पर्धात भाग घेतात. लखनौ येथील १९ वर्षाखालील मुलींची स्पर्धा त्यांनी २०१९-२० मध्ये जिंकली तसेच अनेक व्यवसायिक स्पर्धा त्यांनी जिंकल्या. २०२४ च्या ऑगस्ट मध्ये त्यांनी कर्नाटकातील बेळगाव येथे झालेल्या राष्ट्रीय युवा स्पर्धेत अजिंक्यपद मिळवले आणि त्यांचे कौतुक सर्वत्र होऊ लागले.

फुसीदेवी मुलगी मोनिकाची मॅच बघताना

मुलगी मोनिकाची मॅच मोठ्या आनंदाने आणि अभिमानाने बघणाऱ्या मोनिकाच्या आई फुसीबाई म्हणतात की या खेळाने आमच्या मुलींना खूपच सक्षम केले आहे. त्या विविध राज्यात प्रवास करतात आणि मोठ्या आत्मविश्वासाने खेळतात याचे त्यांना खूप कौतुक वाटते. त्यांच्या मते ट्रेनिंग आणि स्पर्धात्मक खेळामुळे मुली जगात कसे वावरावे याचंही शिक्षण घेतात.

महिला जागरण समिती फ़ुटबॉलच्या अनेक प्रसिद्ध कोचेसना महिला ट्रेनिंग द्यायला बोलावतात. इंग्लिश प्रीमिअर लीग साठी खेळणारी एकमेव भारतीय फुटबॉल पटू तन्वी हंस देखील या मुलींना ट्रेनिंग द्यायला येत असते. तन्वी यांनी सांगितले की या खेळामुळेच या घरकाम किंवा शेतीकाम करणाऱ्या मुलींचे आत्मभान जागृत झाले आणि सक्षमीकरण झाले. या मुली त्यांच्या आईवडलांशी शांतपणे बोलून, त्यांना समजावून देऊन त्यांचे हक्क मागू लागल्या हे अतीव महत्त्वाचे आहे. मुलींना फुटबॉल या खेळाने आत्मभानाबरोबरच आत्मविश्वास दिला आहे. तसेच त्यांना समयसूचकता, उत्तम निर्णय क्षमता आणि पराभवाला कसे धीराने सामोरे जावे असे अनके मोलाचे धडे दिले आहेत.

नेल्सन मंडेलांच्या अत्यंत यशस्वी प्रयागवरून स्फूर्ती घेणाऱ्या राजस्थानातील महिला जागरण समितीने खेड्यातील लहान मुलींना फुटबॉल सारख्या पुरुषी वर्चस्वाच्या स्पर्धात्मक खेळाचे ट्रेनिंग देऊन तेथील बालविवाह आणि जातीभेदाच्या अन्याय्य कुप्रथांना संपवले तर आहेच. मुलींना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देऊन त्यांना सक्षम करून मोठी स्वप्ने बघण्याचा आणि ती पूर्ण करण्याचा आत्मविश्वासही दिला आहे हे विशेष!

---

# उद्याचे "गृह मनोरंजन"

**२०२२ नंतर न्यू नॉर्मल जीवन पद्धती आपल्याला अनुभवायची आहे. घरबसल्या कार्यपद्धती (वर्क फ्रॉम होम) हे सुद्धा महत्वाचे ठरणार आहे. घर स्मार्ट असणे अत्यावश्यक असणार आहे. तंत्रज्ञान जगभरातील घरे बदलत आहे आणि भविष्यातही आपल्या घरांवर त्याचा परिणाम होत राहील यात आश्चर्य नाही. जर बहुतांश जीवन जर घरातून जगायचे असेल तर मनोरंजन कसे विसरता येईल . सतत काम करायला आपण यंत्रमानव नाही आहोत. मनोरंजन ही एक अत्यावश्यक बाब आहे . आता आपण ह्या क्षेत्रातील भविष्यातील प्रवाहांची माहिती घेऊ.**



सर्वात महत्वाचे मित्राकडून वा सहकल असलेल्या वापरकर्त्याकडून मिळालेली शिफारस, आपल्या आवडत्या कलाकाराच्या आवाजाची ओळख आणि उपकरणांचे एकत्रीकरण हे प्रवाह असतील. अनेक नेटवरील स्ट्रीमिंग (ओटीटी) सेवांच्या आगमनामुळे आम्ही मनोरंजन माध्यम शोधण्याच्या आणि वापरण्याच्या पद्धतीत सुधारणा केलीच आहे. प्रेक्षक सेवांशी संवाद साधण्यास प्राधान्य देणारा ध्वनी हा अधिकाधिक लोकप्रिय मार्ग बनत आहे. वापरकर्त्यांना मनोरंजन सेवादेयकांकडून काय हवे आहे हे समजून घेण्यासाठी नैसर्गिक भाषा अल्गोरिदम वापरणे अधिक सोपे होत चालले आहे.

प्रेक्षक सेवांशी संवाद साधण्यास प्राधान्य देणारा ध्वनी हा अधिकाधिक लोकप्रिय मार्ग बनत आहे. वापरकर्त्यांना मनोरंजन सेवादेयकांकडून काय हवे आहे हे समजून घेण्यासाठी नैसर्गिक बोली भाषा वापरणे अधिक सोपे होत चालले आहे . त्यामुळे संवादाचे माध्यम माउस व रिमोट कंट्रोल हे काही वर्षात नष्ट होईल . व्हर्च्युअल इव्हेंट्स, परफॉर्मन्स आणि शो या सर्वांची लोकप्रियता वाढली आहे . यामुळे मेटाव्हर्सचा उदय झाला – ऑनलाइन, आणि इंटरकनेक्ट केलेले डिजिटल वातावरण जिथे आपण समाजीकरण करण्यासाठी, काम करण्यासाठी आणि अर्थातच मनोरंजनासाठी भेटू शकतो. म्हणजे एकाच ठिकाणाहून सर्व गोष्टी शक्य होतात. ह्यासाठी लागणारी उपकरणेही घरातील भिंतींवर अंतर्भूत केले जाईल . प्रचलित दूरदर्शन संच , सेट टॉप बॉक्स, रिमोट कंट्रोल हे सर्व आता काही वर्षांचेच आपले सहचर आहेत. वॉकमन, पेजर च्याच दिशेने त्यांची वाटचाल सुरु आहे . ह्यासाठी लागणारी उपकरणेही घरातील भिंतींवर अंतर्भूत केले जाईल .



तंत्रज्ञान
डॉ. दीपक शिकारपूर
पंढरी संचार
deepak@deepakshikarpur.com
संगणक तज्ञ

पुढील १० वर्षांमध्ये, पारंपारिक दूरदर्शन संच स्क्रीन, व्हर्च्युअल रिऍलिटी (VR) नेत्र-पोशाख आणि हेडसेटसह जोडलेल्या परिधान केलेल्या उपकरणांसाठी साठी मार्ग बनवण्याची शक्यता आहे. आज आपल्याकडे ५० कोटी सेलफोनधारक आहेत आणि त्यांची संख्या दरमहा ५० ते ६० लाखांनी वाढते आहे. सध्या प्रत्येकाच्याच हाती स्मार्टफोन्स दिसू लागल्याने हँडसेटवरून 'लाइव्ह स्ट्रीमिंग व्हीडिओ'पाहणार्यांची संख्या विलक्षण वाढणार आहे. बरेच लोक सिनेमे , वेब सिरीज सेलफोन वर पाहतात . प्रवास करताना हे त्यांना सोयीचे पडते . अनेकांकडे लॅपटॉप , डेस्कटॉप , टॅब्लेटपीसी नसल्याने हेच उपकरण वापरले जाते . हे सत्य लक्षात घेऊन सिने निर्मात्यांनी अनेक आवृत्त्या निर्माण करणे गरजेचे आहे . साधे मोबाईल साजेसे व अधिक ग्राफिक साऊंड एफ्फेक्त असलेली आवृत्ती चित्रपटगृहात विशिष्ट चष्म्यासहित .

लोकडाऊन मधील बंदिस्त घरबसल्या सर्वकाही ह्या जीवनपद्धतीला सरावलेल्या अनेक व्यक्तींना प्रेक्षागृहात जाणे जीवावर येते. प्रवास, गर्दी, ट्रॅफिक जॅम , वाहन पार्किंग ह्या समस्या पण आहेतच. अजून एक गोष्ट म्हणजे नेटवरील मनोरंजन हवे तेंव्हा , हवे तेवढे आणि हवे तसे पाहता येते . कंटाळा आला तर चॅनेल/माध्यम बदलणे आपल्या हातात आहेच. हा बदल मनोरंजन क्षेत्रातील सर्व घटकांनी स्वीकारायला हवा . गृहमनोरंजन हा व्यावसायिक बदल त्यामुळे गांभीर्याने घ्यायला हवा .

---

# तरुणींमध्ये लोकप्रिय ट्रेंड - गरारा ड्रेस



**भारतीय पारंपरिक पोशाखांमध्ये सतत नवीन फॅशन ट्रेंड येत आहेत. सध्या तरुणींमध्ये विशेषतः लोकप्रिय असलेला ट्रेंड म्हणजे गरारा ड्रेस. हा पोशाख परंपरा आणि आधुनिकतेचा सुंदर मिलाफ आहे, जो कोणत्याही खास प्रसंगासाठी आकर्षक आणि भव्य दिसतो.**

**गरारा ड्रेस हा केवळ पोशाख नसून तरुणींमध्ये परंपरेचा अभिमान आणि आधुनिकतेची झलक दाखवणारा फॅशन स्टेटमेंट आहे. कोणत्याही प्रसंगाला शोभून दिसणारा हा ड्रेस प्रत्येक तरुणीच्या वॉर्डरोबमध्ये असायलाच हवा. गरारा ड्रेसच्या वैविध्यपूर्ण प्रकारांमुळे तो सध्या तरुणींचा सर्वाधिक आवडता फॅशन ट्रेंड बनला आहे.**

### गरारा ड्रेस म्हणजे काय?

गरारा ड्रेस हा पारंपरिक भारतीय पोशाख आहे, जो दोन प्रमुख भागांचा बनलेला असतो.

1. फ्लेयर्ड पँट्स: गुडघ्यापर्यंत टाइट आणि खाली मोठ्या प्रमाणात पसरलेल्या पँट्स.

2. कुर्ता: लांबसर किंवा थोडकासा छोटा, डिझाइनर कुर्ता.

3. दुपट्टा: भरजरी नक्षीकाम असलेला किंवा साधा, आकर्षक दुपट्टा.

हा पोशाख खास सण, लग्नसमारंभ, आणि पार्टीसाठी तयार केला जातो.



फॅशन
ज्योती हांडगे, पुणे
पंढरी संचार

### गरारा ड्रेसचा इतिहास

गरारा ड्रेसचा उगम 19व्या शतकात लखनौमध्ये झाला. तो कालांतराने भारतीय परंपरेचा एक महत्त्वाचा भाग बनला. सध्या, गरारा ड्रेस हा भारतासह आंतरराष्ट्रीय फॅशनमध्येही लोकप्रिय आहे.

### गरारा ड्रेसची वैशिष्ट्ये

1. फुललेल्या पँट्स: हा ड्रेस वेगळा दिसतो कारण त्याच्या गुडघ्यापासून पसरलेल्या पँट्स भव्य लूक देतात.

2. भरजरी डिझाइन: कापडावर नक्षीकाम, झरी, गोटा-पट्टी, आणि एम्ब्रॉयडरी यांचा वापर करून पोशाख आकर्षक बनवला जातो.

3. साजेशा रंगसंगती: गरारा ड्रेस विविध रंगांच्या संयोगाने तयार होतो, जो प्रत्येक प्रसंगाला अनुरूप असतो.

4. आरामदायक कापड: कॉटन, सिल्क, शिफॉन, आणि जॉर्जेटसारख्या कापडांचा वापर.

### गरारा ड्रेसचे प्रकार



1. पारंपरिक गरारा: झरी व गोटा-पट्टीने सजवलेला, खास पारंपरिक समारंभांसाठी.

2. इंडो-वेस्टर्न गरारा: आधुनिक टच असलेला, ज्यामध्ये क्रॉप टॉप किंवा मॉडर्न कुर्त्याचा समावेश असतो.

3. सिंपल गरारा ड्रेस: साधा आणि दररोज परिधान करता येईल असा.

4. हाय-फॅशन गरारा: मोठ्या समारंभासाठी विशेषतः डिझाइन केलेला ड्रेस, ज्यामध्ये जड काम केलेले असते.

### गरारा ड्रेस कधी परिधान करावा?

सण आणि उत्सव: अनेक भारतीय सणांसाठी आणि उत्सवांसाठी गरारा हा परिपूर्ण पर्याय आहे.

लग्न समारंभ: मेहेंदी, संगीत, आणि लग्नातील इतर कार्यक्रमांसाठी हा ड्रेस भव्य लूक देतो.

पार्टीसाठी: साध्या पोशाखाला उठाव देण्यासाठी आधुनिक गरारा ड्रेस योग्य ठरतो.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ **http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com**

# सुरक्षित महाराष्ट्र निर्माण करुया- उपमुख्यमंत्री अजित पवार

## पोलीस उपमुख्यालय बऱ्हाणपूर येथे पोलीस विभागाकरीता ४ स्कॉर्पिओ वाहनांचे लोकार्पण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**बारामती :** राज्यात कायदा व सुव्यवस्था सुस्थितीत राहण्याकरीता पोलीस दलाला सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन सुसज्ज करणे ही राज्य शासनाची प्राथमिकता आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले. सर्वांच्या प्रयत्नातून आगामी काळात कायदा व सुव्यवस्थेत अग्रेसर व सुरक्षित महाराष्ट्र निर्माण करुया, असा संकल्पही त्यांनी व्यक्त केला.

पोलीस उपमुख्यालय बऱ्हाणपूर येथे पोलीस विभागाकरीता ४ स्कॉर्पिओ वाहनांचे लोकार्पण तसेच तालुक्यातील नागरिकांना त्यांचा चोरी गेलेला मुद्देमाल वितरण समारंभाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उप विभागीय अधिकारी वैभव नावडकर, उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बप्पा बहीर, महावितरणचे मुख्य अभियंता धर्मराज पेटकर, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पवार, तहसीलदार गणेश शिंदे, मुख्याधिकारी महेश रोकडे, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक संभाजी होळकर, बारामती सहकारी बँकचे अध्यक्ष सचिन सातव, बऱ्हाणपूरचे सरपंच बाळासाहेबत चांदगुडे आदी उपस्थित होते.

श्री. पवार म्हणाले, ग्रामीण भागात ड्रोन फिरत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी व भीती लक्षात घेऊन जिल्हा ग्रामीण पोलीस दलालाकरीता ३८ लाख रुपयांच्या दोन ड्रोन प्रतिबंधक बंदूक (अँटी ड्रोनगन) खरेदीकरीता मंजूरी देण्यात आली आहे, जिल्ह्याचे कार्यक्षेत्र विचारत घेवून आणखीन दोन ड्रोन प्रतिबंधक बंदूक उपलब्ध करुन देण्यात येईल. बऱ्हाणपूर परिसरात उभारण्यात आलेल्या पोलीस उपमुख्यालयात प्रशासकीय इमारत, पोलीस अधीक्षक निवासस्थान, उपअधीक्षक निवासस्थान, सायबर पोलीस ठाणे, विश्रामगृह, प्रशिक्षण केंद्र, बहुद्देशीय सभागृह, वसतिगृह, निवासस्थाने आदी इमारतींचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहेत. आता अत्याधुनिक आणि आतंरराष्ट्रीय दर्जाची धावपट्टी, नेमबाजी मैदानाचे (शुटिंग रेंज) काम सूरू आहे.

विविध गुन्ह्याचा शोध लावण्याकरीता श्वानाची भूमिका महत्त्वपूर्ण असते, त्यामुळे गोजुबावी श्वान प्रशिक्षक केंद्राच्या इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आले आहे. बारामती तालुका पोलीस दलासाठी अजून २ स्कॉर्पिओ वाहने लवकरच उपलब्ध करुन देण्यात येतील. नागरिकांची सुरक्षा अबाधित ठेवण्याकरीता अनूचित प्रकाराला आळा घालण्यासोबतच कायदा व सुव्यवस्था सुस्थितीत राहण्याकरीता पोलीस दलाने नेहमीच प्रयत्नशील राहावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याकरिता पोलीस प्रशासनास सहकार्य करावे. तालुक्यातील नागरिकांचा चोरी गेलेला एकूण १६ लाख ३३ हजार ४२५ रुपयांचा मुद्देमाल मूळ मालकांना हस्तांरित करण्याच्या कार्यक्रमामुळे पोलीस दलाप्रती नागरिकांच्या मनात विश्वास अधिक वृद्धींगत होणार आहे. परिसरात अनुचित प्रकार घडत असल्यास पोलीसांना कळवावे, नागरिकांच्या सुरक्षितेतच्यादृष्टीने शक्ती अभियानाअंतर्गत शक्ती पेटी विविध भागात ठेवण्यात आल्या आहेत. तक्रारदारांची नावे गोपनीय ठेवून पोलीस योग्य ती कारवाई करीत आहेत. वाहतुकीच्या नियमांचे उल्लघंन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत असून नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करून पोलीस प्रशासनास सहकार्य करावे.

तालुका व शहरात सर्व प्रकारची विकासकामे दर्जेदार पद्धतीने करुन बारामती एक आदर्श शहर म्हणून देशात उदयास आले पाहिजे, बारामती तालुका देशात विकासकामांच्या बाबतीत क्रमांक एकचा तालुका म्हणून करायचा आहे, यादृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहे. सुमारे ३०० कोटी रुपयांचे पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे काम करण्यात येणार आहे. तालुक्यात विविध विकासकामे सुरु असून याकरीता नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहनही श्री. पवार यांनी केले.

---

Selected

### जेजुरी उद्योजक संघाचे उपाध्यक्ष पांडुरंग सोनवणेंना आदर्श उद्योजक पुरस्कार



**जेजुरी :** जेजुरी उद्योजक संघाचे उपाध्यक्ष ,राज इंडस्ट्रीजचे चेअरमन पांडूरंग दादासाहेब सोनवणे यांना बीड जिल्ह्यातील आष्टी येथील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने गंगाई - बाबाजी राज्यस्तरीय आदर्श उद्योजक पुरस्कार अभिनेत्री कल्याणी चौधरी व माजी आमदार भिमराव धोंडे यांच्या हस्ते पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात आले . उद्योजक पांडुरंग सोनवणे यांनी उद्योग व शेती क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र शासन,व विविध संस्थांच्या वतीने आदर्श उद्योजक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. या पुरस्कारा बद्दल पांडुरंग सोनवणे यांचे जेजुरी उद्योजक संघ,कडेपठार स्पोर्ट्स क्लब,जेजुरी शहर पत्रकार संघाच्या अभिनंदन करण्यात आले.

### रांजणीत श्री गणेश जयंती उत्साहात



**रांजणी :** रांजणी (ता.आंबेगाव ) येथील वाघ - खिलारी वस्तीत श्री गणेश जयंती उत्साहात साजरी झाली. रांजणी गावातील मोरया युवा प्रतिष्ठान व वाघ - खिलारी वस्तीमधिल कुटुंबे दरवर्षी गणेश जयंती कार्यक्रम साजरी करतात. येथिल गणेश मंदिरात शनिवारी (दि . सकाळी गणपती मुर्तीची पुजा करण्यात आली. त्यानंतर अभिषेक करण्यात आला. गणेश ज्योत व मांडव डहाळ्यांची गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणूकीत कलशधारी महिला, मोरया युवा प्रतिष्ठानचे सभासद सहभागी झाले होते. त्यानंतर ह.भ.प आदीनाथ महाराज जुन्नरकर (खडकी) यांचे काल्याचे कीर्तन झाले. या कीर्तनाला गावातील श्री. नरसिंह, विठ्ठल, भैरवनाथ, नागेश्वर भजन मंडळांची साथ लाभली. काल्याच्या कीर्तनानंतर सर्व उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## ठमाच्या दिव्यांनी रानमळा उजळला



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** रानमळा (ता. आंबेगाव ) येथील धर्मनाथ महाराजाच्या (बीज) यात्रेनिमित विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. बिजेच्या दिवशी सायंकाळी सातच्या नंतर महिलांनी ठमाचा (गव्हाच्या कणकेपासून बनविलेला ) दिवा डोक्यावर घेऊन गावातून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी असंख्य दिव्यांच्या ज्योतीच्या प्रकाशाने रानमळा गाव उजाळून निघाले होते. धर्मनाथ महाराजाच्या यात्रेच्या पहिल्या दिवशी गावातील प्रत्येक कुटुंबातील महिलेने पेटविलेल्या ठमाचा दिवा डोक्यावर घेऊन गावातून मिरवणूक काढली.

यावेळी मिरवणूकीच्या अग्रभागी ग्रामस्थांचे पारंपारिक ढोल लेझीम व पारंपारिक वाद्य पथक होते. मिरवणूकीमध्ये परिसरातील नागरिकांनी सहभाग घेतला होता. यावेळी धर्मनाथ महाराज बीजेनिमित्त देवास अंबिल,मलिदा,ज्वारीच्या घुगर्या व भाजीचा नैवेद्य देवाला भावपूर्ण अर्पण करण्यात आला. यात्रेनिमित्त धर्मनाथ महाराजांच्या मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.याबाबत सरपंच राजू सिनलकर,उपसरपंच भारती सिनलकर,पोलिस पाटील रूपेश सिनलकर,संतोष सिनलकर,भास्कर सिनलकर,बबन सिनलकर,निवृती सिनलकर आदिंनी माहिती दिली.

---

## वढू बुद्रुक मराठ्यांच्या पराक्रमाचे साक्षीदार - संभाजी शिवले

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



शिक्रापूर श्री क्षेत्र वढू बुद्रुक ता. शिरूर येथील छत्रपती संभाजी महाराज समाधीस्थळी बीजेएस महाविद्यालयाचा हेरिटेज वॉक प्रसंगी मान्यवर.

**शिक्रापूर :** श्री क्षेत्र वढू बुद्रुक ता. शिरूर हे ठिकाण मराठ्यांच्या पराक्रमाचे, शौर्याचे व बलिदानाचे तेरावे ज्योतिर्लिंग व राष्ट्र तेजाचे धगधगते अग्निकुंड असून या भूमीत छत्रपती शंभूराजांचे रक्त आणि प्राण मिसळलेले असल्याने या भूमीचे श्रेष्ठ स्थान असून ते प्रेरणादायी आहे. मराठ्यांच्या इतिहासाची रक्तरंजित, चित्तथरारक असे जाज्वल्य पराक्रमाची साक्षीदार असलेली वीरभूमी म्हणजे वढू बुद्रुक असल्याचे प्रतिपादन संभाजी शिवले गुरुजी यांनी बीजेएस महाविद्यालयातील इतिहास विभागाने आयोजित केलेल्या हेरिटेज वॉक प्रसंगी मत व्यक्त केले.

श्री क्षेत्र वढू बुद्रुक ता. शिरूर येथील छत्रपती संभाजी महाराज समाधीस्थळी बीजेएस महाविद्यालयाचा हेरिटेज वॉक संपन्न झाला, सदर कार्यक्रमाचे आयोजन डॉ. भूषण फडतरे, डॉ. सचिन कांबळे, प्रा. बंडू ब्राम्हणे, शुभम आव्हाळे माजी विद्यार्थी किरण शिवले. सरपंच ज्ञानेश्वर भंडारे, संतोष शिवले व ग्रामपंचायत सर्व सदस्य यांनी केले. तर सदर हेरिटेज वॉक प्रसंगी छत्रपती शंभूराजे व कवी कलश यांच्या समाधीवर नतमस्तक होत प्रतिमेचे पूजन करण्यात आले यावेळी सरपंच ज्ञानेश्वर भंडारे, माजी सरपंच अंकुश शिवले, अनिल शिवले, माजी उपसरपंच हिरालाल तांबे, रमाकांत शिवले, संतोष शिवले, ग्रामविकास अधिकारी शंकर भाकरे, पोलीस पाटील जयसिंग भंडारे, माजी विद्यार्थी किरण शिवले, संतोष शिवले यांसह अन्य मान्यवर व विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान संभाजी शिवले गुरुजी छत्रपती संभाजी महाराजाच्या जन्मापासून ते हत्येपर्यंतचा इतिहास व मृत्युसमयी झालेल्या हालअपेष्टा ऐकताना विद्यार्थी भरलेल्या डोळ्यांनी अक्षरशः भारावले होते, तसेच प्राचार्य डॉ. संजय गायकवाड यांनी अहिल्याबाई होळकरांचे कार्य आणि कर्तृत्व या विषयावर मौलिक माहिती दिली आणि विद्यार्थ्यांनी हेरिटेज वॉकमध्ये छत्रपती संभाजी महाराज समाधी, कवी कलिश समाधी, शिवमंदिर इत्यादी वास्तूंचा इतिहास समजावून घेतला आणि प्रयाग राज येथील कुंभमेळ्यातील आणलेल्या पवित्र कलशातील जल शंकराच्या मंदिरात रुद्र पठण करत तेथील पिंडीवर अर्पण करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सचिन कांबळे यांनी केले तर प्रास्ताविक डॉ. भूषण फडतरे यांनी केले आणि चेअरमन बाळासाहेब सूर्यवंशी यांनी आभार मानले.

---

## कुपनलिका घेण्यावरती बंदी आणावी

### बाभूळसर खुर्द ग्रामस्थांची मागणी



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** शिरूर तालुक्यातील बाभूळसर खुर्द येथे भविष्यातील शेतीच्या पाण्याचा विचार करून गावातील गुंठे धारकांनी कृपनलिका घेऊ नयेत व कुपनलिका घेण्यावरती बंदी आणावी अशी मागणी ग्रामसभेत करण्यात आली व याबाबत ठराव संमत करण्यात आला. २६ जानेवारी रोजी सरपंच सोनाली दशरथ फंड यांच्या अध्यक्षतेखाली यांच्या अध्यक्षते खाली घेण्यात आलेल्या ग्रामसभेत हा ठराव घेण्यात आला. बाभूळसर ग्रामपंचायत च्या या ठरावाचे सर्वत्र कौतुक होत आहे

गावातील कुपनलिकांचे प्रमाण वाढल्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील विहिरीचे पाणी कमी होऊ लागले. ग्रामसभेस ग्रामस्थांनी एकमताने मागणी केली गेली कि, गावातील गुंठे धारक घेत असलेले बोअरवेल बंद करावेत. कारण जर आज प्रत्येक जण असे कुपनलिका घेत गेले तर गावातील शेतकऱ्यांचे फार मोठे हाल होतील व गावातील पाण्याची पातळी खोलवर जावून शेतकऱ्यांचे विहिरींचे पाणी सुद्धा जाईल. व परिणामी शेतकरी वर्ग अडचणीत येईल. त्यामुळे ग्रामसभेत सर्वानुमते गावातील गुंठेधारक घेत असलेले कुपनलीकेसाठी बंदी करण्याचे सर्वानुमते ठरले. व यापुढे कोणीही कुपनलिका घेवू नये असे आव्हान आजच्या ग्रामसभेत सर्वानुमते व एकमताने करण्यात आले.

---

## रानमळ्यात बैलगाडा शर्यती उत्साहत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** भिर्रर....भिर्रर.... झाली.... उचल की टाक..... अशा भारदस्त पहाडी आवाजात तापलेल्या उन्हात हजारो बैलगाडा शौकिनांनी रानमळा (ता.आंबेगाव ) येथे धर्मनाथ महाराजांच्या (बीज) यात्रेनिमित्त आयोजित केलेल्या बैलगाडा शर्यतीचा मनसोक्त आनंद लूटला.या बैलगाडा शर्यतीत एकूण १९० बैलगाडे धावले.या बैलगाडा शर्यतीमध्ये फळी फोड गाड्यात पहिल्यात पहिला हेमंतकुमार बाबाजी पोखरकर, राहूल गुलाब जाधव / विकास पंचरास, दुसर्यात पहिला श्रेयश रंगनाथ करंजखेले (धामणी )व प्रकाश उत्तम बगाटे (पाबळ), तिसर्यात पहिला राजामाता अहिल्यादेवी बैलगाडा संघटना ( जारकरवाडी), सुखदेव हिरामण आदक (वडगावपीर), चौथ्यात पहिला विराज संदिप सैद ( अवसरी ), नैतीक कमलेश वळसे ( निरगुडसर ) या बैलगाड्यांनी मान मिळविला तर घाटाचा राजा हा मान भगवान नामदेव सिनलकर (रानमळा) व बाबा देवराम आदक (वडगावपीर )यांनी मिळवला.

आकर्षक बारीचा मान विकास पंचरास (लोणी) यांनी मिळविला. या परिसरात पहिलीच यात्रा असल्यामूळे बैलगाडा शर्यती पाहाण्यासाठी गाडा शौकीन मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैलगाड शर्यती दरम्यान अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या. शर्यत पाहाण्यासाठी गाडामालक, गाडाशौकीन, ग्रामस्थ व विशेष म्हणजे तरुणांनी मोठी गर्दी केली होती.

---

## रोमहर्षक क्षण :

पंढरी संचार छायाचित्र सेवा



लोणी-धामणी रानमळा (ता.आंबेगाव ) येथील बैलगाडा शर्यतीत एक रोमहर्षक क्षण.

---

### श्रीमंत बाबुजी नाईक यांचा इतिहास नव्या पिढीसमोर आणण्याच्या दृष्टीने परिसर विकसित करा-उपमुख्यमंत्री

# अजित पवार यांच्याकडून बारामतीतील विकासकामांची पाहणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** श्रीमंत बाबुजी नाईक वाडा परिसराचा विकास प्राचीन आणि आधुनिकतेचा संगम साधत आणि वाड्याचे मूळ रूप जतन करत करावा; या माध्यमातून त्यांचा इतिहास तसेच भीमथडी ते बारामती असा बदलता प्रवास नव्या पिढीसमोर आणण्यासाठी प्रयत्न करा, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले.





बारामती परिसरातील श्रीमंत बाबुजी नाईक वाडा सुशोभीकरण, दशक्रिया घाट परिसर, गोजुबावी श्वान प्रशिक्षक केंद्र इमारत बांधकाम आदी विविध विकास कामांच्या पाहणी प्रसंगी त्यांनी हे निर्देश दिले. यावेळी अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उप विभागीय अधिकारी वैभव नावडकर, उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बप्पा बहीर, महावितरणचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पवार, तहसीलदार गणेश शिंदे, मुख्याधिकारी महेश रोकडे, बारामती सहकारी बँकेचे अध्यक्ष सचिन सातव आदी उपस्थित होते.

श्रीमंत बाबुजी नाईक वाडा येथील विकासकामे करताना परिसरात भीमथडी ते बारामती असा बदलता प्रवास दाखविणारी छायाचित्रे लावावीत. परिसरात अधिकाधिक सावली देणाऱ्या विविध प्रजातीचे वृक्षारोपण करावे. नागरिकांना बसण्यासाठी वृक्षाला गोल दगडी ओटा करा.

कऱ्हा नदीच्या संरक्षक भिंतीची कामे गतीने करा. परिसरातील चेंबरवर स्थानिक पक्षाची छायाचित्रे लावून त्याची मराठी आणि इंग्रजी भाषेत माहिती नमूद करावी. नदीच्या नैसर्गिक प्रवाहाला अडथळा निर्माण होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. परिसरात स्वच्छता राहील याद्दष्टीने महाविद्यालयीन विद्यार्थी, सामाजिक संस्था आणि नागरिकांच्या मदतीने स्वच्छता मोहीम राबवावी. परिसर देखभाल दुरुस्तीसाठी नगर परिषदेने उत्पन्नाचे स्रोत निर्मितीबाबत विचार करावा. दशक्रिया विधी घाट परिसरात स्वच्छता ठेवावी, असेही श्री. पवार म्हणाले.

# ग्लॅम वर्ल्ड

## परत येतेय अरुंधती!



स्टार प्रवाहवरील 'आई कुठे काय करते' मालिकेने काही दिवसांपूर्वीच प्रेक्षकांचा निरोप घेतला. मालिकेने निरोप घेतला असला तरी यातील प्रत्येक पात्र आजही प्रेक्षकांच्या मनात कायम आहे. प्रेक्षकांची लाडकी अरुंधती पुन्हा एकदा भेटीला येणार आहे. 'आई आणि बाबा रिटायर होत आहेत' मालिकेत सध्या स्वीटी आणि मकरंदच्या लग्नाची धामधूम सुरु आहे. या दोघांच्या लग्नात अरुंधती खास हजेरी लावणार आहे. येत्या काही दिवसांमध्ये प्रेक्षकांच्या लाडक्या अरुंधतीची झलक पाहायला मिळेल. अभिनेत्री मधुराणी प्रभुलकर याबद्दल सांगताना म्हणाली की, 'पुन्हा एकदा अरुंधती साकारायला मिळतेय याचा अतिशय आनंद होतोय. साधारण दीड महिन्यापूर्वी आमच्या मालिकेने निरोप घेतला. प्रेक्षकांप्रमाणेच मी देखील अरुंधतीला खूप मिस करत होते. सेटवरची लगबग, हातातली स्क्रिप्ट, कॅमेरा या सगळ्या गोष्टी खूप दिवसांनंतर अनुभवायला मिळत आहेत. 'आई आणि बाबा रिटायर होत आहेत' मालिकेत स्वीटी आणि मकरंदच्या लग्नाच्या निमित्ताने अरुंधती खास हजेरी लावणार आहे. 'आई आणि बाबा रिटायर होत आहेत' या मालिकेबद्दल बोलायचे झाल्यास अभिनेत्री निवेदिता सराफ आणि मंगेश कदम हे प्रमुख भूमिकेत पाहायला मिळत आहेत. तसेच हरीश दुधाडे, प्रतिक्षा जाधव, अपूर्वा परांजपे, किआरा मंडलिक, आदिश वैद्य, पालवी कदम यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

## 'सौभाग्यवती सरपंच'ची चर्चा

मराठीच्या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रादेशिक विषय हाताळून नवनवे प्रयोग केले जात आहेत. त्यापैकी एक म्हणजे 'सौभाग्यवती सरपंच' ही वेब सीरिज. प्रजासत्ताक दिनाचं औचित्य साधत ही सीरिज अल्ट्रा झक्कास मराठी ओटीटीच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला आली. गावातल्या महिला समाजाच्या विकासासाठी पुढाकार घेतात, तेव्हा त्यांना अनेक अडथळ्यांना सामोरं जावं लागतं, पण त्यातूनही मार्गक्रमण करत त्या कशा पुढे जातात, हे सीरिजमध्ये दाखवण्यात आले आहे. गावाकडच्या राजकारणाचा तडकादेखील सीरिजमध्ये आहे. दादाराव, गावाचा दोन टर्म सरपंच आहे, तर दुसरीकडे त्याची पत्नी, अवली, तिचे आयुष्य तिचा संसार, नवरा, मुलगा, सासू या भोवतीच फिरते. पण संसार सांभाळणाऱ्या महिलेच्या हातात गावाचा कारभार येतो तेव्हा ती तिचं कर्तृत्व दाखवून देते. सरपंच झाल्यानंतर अवली काय काय करते, समस्यांवर कसा तोडगा काढते, त्याचे किस्से सीरिजमध्ये पाहायला मिळतात. अवलीसाठी गृहिणी ते सरपंच हा प्रवास काही सोपा नाही. घरातल्यांच्या सुनेकडून, पत्नीकडून, आईकडून असलेल्या अपेक्षा तर दुसरीकडे गावाच्या समस्या. गावासाठी चांगले काय तरी करण्याची इच्छा, पण त्यामुळे कुटुंबाकडे झालेलं दुर्लक्ष, कुटुंबाच्या आनंदाचा त्याग हे मुद्दे प्रेक्षकांना खिळवून ठेवतात. या सीरिजमध्ये देविका दफ्तरदार, किशोर कदम, नागेश भोसले आणि अश्विनी कुलकर्णी यांसारखे कलाकार सीरिजमध्ये महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. संतोष कोल्हे हे 'सौभाग्यवती सरपंच' या वेब सीरिजचे दिग्दर्शक आहेत. ही सीरिज अल्ट्रा झकास मराठी ओटीटीवर प्रेक्षकांना पाहता येणार आहे.




## 'देवा' प्रेक्षकांच्या भेटीला

बॉलिवूड स्टार शाहिद कपूर आणि पूजा हेगडे यांच्या बहुप्रतिक्षित ॲक्शन थ्रिलर 'देवा'चा ट्रेलर प्रदर्शित झाला. चित्रपटात शाहिद कपूर एका पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत आहे, तर पूजा हेगडे त्याच्या मैत्रिणीच्या भूमिकेत आहे. ट्रेलरमध्ये शाहिद कपूर देव आंब्रेच्या भूमिकेत आहे, त्याची ॲक्शन आणि जबरदस्त स्टंट्स पाहून चाहत्यांची मनं थबकतील. शाहिदसोबत पूजा हेगडेही महत्त्वाच्या भूमिकेत दिसत आहे. रोशन अँड्रयूज दिग्दर्शित आणि झी स्टुडिओज आणि रॉय कपूर फिल्म्स निर्मित 'देवा' हा चित्रपट ३१ जानेवारीला प्रदर्शित होणार आहे. देवा चित्रपटात शाहिद कपूर आणि पूजा हेगडे यांच्याशिवाय कुब्बरा सैत आणि पावेल गुलाटी यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत.



## मिथुन चक्रवर्तींचा फर्स्ट लूक समोर


दिग्दर्शक विवेक अग्निहोत्रीचा बहुप्रतिक्षित चित्रपट 'द दिल्ली फाईल्स'चा नवा टीझर रिलीज झाला. या टीझरमध्ये मिथुन चक्रवर्तीचा फर्स्ट लूक समोर आला. विवेक अग्निहोत्री दिग्दर्शित द दिल्ली फाइल्स हा चित्रपट बऱ्याच दिवसांपासून चर्चेत आहे. चित्रपटाच्या टीझरमध्ये मिथुन चक्रवर्ती एका नव्या अंदाजात दिसत आहेत. या चित्रपटाचा टीझर लोकांच्या मनात उत्कंठा निर्माण करत असून, मिथुनचा इंटेन्स लूकही खूप पसंत केला जात आहे. चित्रपटाचा टीझर आणि मिथुन चक्रवर्तीच्या फर्स्ट लूक पोस्टरसोबतच निमर्त्यांनी चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीखही जाहीर केली. चित्रपट १५ ऑगस्ट २०२५ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात मिथुन व्यतिरिक्त अनुपम खेर, पल्लवी जोशी, पुनीत इस्सार आणि गोविंद नामदेव मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. विवेक रंजन अग्निहोत्रीचा द काश्मीर फाईल्स हा चित्रपट २०२२ साली प्रदर्शित झाला होता. चित्रपटाच्या माध्यमातून त्यांनी काश्मीरच्या नरसंहाराचे दृश्य प्रेक्षकांसमोर मांडले. त्याचप्रमाणे त्यांचा आगामी 'द दिल्ली फाइल्स' हा चित्रपटही एका सत्य घटनेवर आधारित आहे.




## एक्सक्लुझिव्ह कंटेंट!

अल्लू अर्जुनचा 'पुष्पा २: द रुल' हा चित्रपट पाच डिसेंबरला प्रदर्शित झाला. प्रदर्शित होऊन ५३ दिवस उलटले असले तरी हा चित्रपट देशात आणि जगभरात धुमाकूळ घालत आहे. चित्रपटाच्या ओटीटी रिलीजची वाट पाहणाऱ्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. 'पुष्पा २' ३० आणि ३१ जानेवारी २०२५ दरम्यान ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. चित्रपटाचे थिएटरनंतरचे डिजिटल अधिकार नेटफ्लिक्सने मोठ्या किमतीत विकत घेतले आहेत. निर्मात्यांनी काही दिवसांपूर्वी घोषणा केली होती की पुष्पा २ हा ५६ दिवसांची विंडो पूर्ण केल्यानंतर थिएटरमध्ये प्रदर्शित होईल. अशा परिस्थितीत आता चित्रपटाने ही विंडो पूर्ण केल्याने ओटीटीवर तो प्रदर्शित होण्याची शक्यता बळावली आहे. असेही वृत्त आहे की नेटफ्लिक्स पुष्पा २ चा एक्सक्लुझिव्ह एक्स्टेंडेड कट रिलीज करणार आहे, म्हणजेच त्यात २० मिनिटांचे न पाहिलेले फुटेज देखील समाविष्ट असेल. मात्र निर्मात्यांनी याबाबत अधिकृतपणे काहीही जाहीर केलेले नाही.

'पुष्पा २' हा देशातील सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला आहे. रिलीजच्या ५३ दिवसांमध्ये भारतीय बॉक्स ऑफिसवर १२३२.३० कोटी रुपयांची कमाई केली आहे. जगभरात या चित्रपटाने १८०० कोटींहून अधिकचा व्यवसाय केला आहे. दंगलचा रेकॉर्ड मोडण्यासाठी हा चित्रपट अवघ्या काही कोटींनी कमी आहे. सध्या, पुष्पा २ हा जगभरात सर्वाधिक कमाई करणारा दुसरा चित्रपट आहे.



## 'किस किसको प्यार करू'चा सिक्वेल

२०१५ मध्ये कपिल शर्माने 'किस किसको प्यार करूं' या चित्रपटाद्वारे मोठ्या पडद्यावर पदार्पण केले. अब्बास-मस्तान दिग्दर्शित या चित्रपटाला प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला आणि बॉक्स ऑफिसवर ४३ कोटींची कमाई केली. नऊ वर्षांनंतर कपिल शर्मा आणि अब्बास-मस्तान पुन्हा एकदा 'किस किसको प्यार करूं २' च्या सिक्वेलसाठी एकत्र आले आहेत. यावेळी कपिलच्या व्यक्तिरेखेवर विशेष लक्ष दिले जाणार आहे. प्रेक्षकांना कॉमेडी आणि गोंधळाचे मिश्रण पाहायला मिळेल. पहिल्या चित्रपटाप्रमाणेच यावेळीही अनेक महिला कलाकार या चित्रपटात दिसणार आहेत. चित्रपटाची कथा कपिलच्या व्यक्तिरेखेभोवती फिरणार आहे, जिथे तो पुन्हा एका मोठ्या गोंधळात अडकलेला दिसणार आहे. यात रोमान्स, ड्रामा आणि कॉमेडी यांचा उत्तम मिलाफ असेल आणि निर्माते प्रेक्षकांना पूर्वीपेक्षा जास्त हसवण्याचा प्रयत्न करतील. कपिलची व्यक्तिरेखाही नव्या आव्हानांना तोंड देताना दिसणार आहे. यावेळी चित्रपटात अभिनेता मनजोत सिंगचाही समावेश आहे. मनजोत 'फुकरे', 'ड्रीम गर्ल' सारख्या चित्रपटांमध्ये उत्कृष्ट कॉमिक टाइमिंगसाठी ओळखला जातो.

पहिल्या चित्रपटात कपिल शर्माने एका तरुणाची भूमिका केली होती. जो चुकून तीन मुलींशी लग्न करतो आणि ते रहस्य लपवण्याचा प्रयत्न करतो. या चित्रपटात कपिलसोबत एली अवराम, सिमरन कौर मुंडी आणि मंजरी फडणीस मुख्य भूमिकेत होत्या.




## रेखा की दीपिका?

अभिनेत्री दीपिका पादुकोण आई झाल्यानंतर पहिल्यांदाच रॅम्पवर आली. दीपिकाच्या एंट्रीने सगळ्यांना अभिनेत्री रेखाची आठवण करून दिली. दीपिकाच्या लुकची तुलना थेट अभिनेत्री रेखाशी केली गेली. दोघींच्या लुकमध्ये आणि दिसण्यामध्ये प्रचंड साम्य असल्याचं दिसतंय. डिझायनर सब्यासाची मुखर्जीच्या ब्रँडला नुकतीच २५ वर्ष पूर्ण झाली. यानिमित्ताने मुंबईत एक भव्य सोहळा पार पडला. ज्यामध्ये दीपिकाच्या मस्त मोनोक्रोमॅटिक स्टाईलने सर्वांची मने जिंकली. दीपिका अप्रतिम, मोहक आणि बोल्ड दिसत होती. सब्यासाचीच्या रॅम्प वॉकवर तिच्या ग्लॅमरस पोशाखाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तिचा संपूर्ण लुक मोनोक्रोमॅटिक ठेवला होता. काळ्या हातमोजे आणि सोनेरी क्रॉस नेकलेसने आणखी आकर्षक बनवलेल्या त्याच रंगाच्या पांढ्या पँटसूट आणि ट्रेंच कोटमध्ये अभिनेत्री खूपच स्टाइलिश दिसत होती. यासोबत तिने चोकर आणि बांगड्या घातल्या होत्या. काही वर्षांपूर्वी नॅशनल अवॉर्ड विजेती अभिनेत्री रेखाही अशाच आउटफिटमध्ये दिसली होती. त्यांनी सनग्लासेस आणि हेडगियरसह समान फॉर्मल पँट वेअर केली होती. त्यामुळे सोशल मीडिया यूजर्सनी तिची रेखासोबत तुलना केली. दोघांचे लूक बऱ्याच प्रमाणात जुळत होते.



## At a Glance

### ऐतिहासिक वाघनखे नागपूरला रवाना



**नागपूर :** साताऱ्याच्या संग्रहालयात मागील सात महिन्यांपासून असलेली छत्रपती शिवाजी महाराजांची ऐतिहासिक वाघनखे नागपूरला रवाना झाली आहेत. ही वाघनखे नागपूर येथील मध्यवर्ती संग्रहालयात आठ महिने पाहण्यासाठी ठेवण्यात येणार आहेत. साताऱ्यातील संग्रहालयात या वाघनखांसाठी तयार करण्यात आलेल्या दालनात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या हाताचा ठसा तसेच साताऱ्याचे संस्थापक शाहू महाराज यांचा बिचवा अथवा शिवकालीन एकधारी वाघनखं ठेवण्याबाबत पुरातत्त्व विभागाकडून विचारमंथन सुरू आहे. लंडन येथील व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियममध्ये असलेली ही ऐतिहासिक वाघनखे साताऱ्यातील संग्रहालयात १९ जुलै २०२४ रोजी दाखल झाली. २० जुलैपासून ही वाघनखे तसेच शिवशस्त्र शौर्यगाथा हे शस्त्र प्रदर्शन नागरिकांना पाहण्यासाठी खुले करण्यात आले.

### लाचखोर लिपिक पोलिसांच्या जाळ्यात

**मुंबई :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या मुख्यालयातील बाजार परवाना विभागातील एका लिपिकाला लाच घेताना पोलिसांनी रंगेहाथ अटक केली. ही कारवाई केडीएमसीच्या मुख्यालया शेजारी असलेल्या सुभाष मैदानावर करण्यात आली. प्रशांत धिवर असे क्लार्क पदावर कार्यरत असलेल्या या लाचखोर लिपिकाचे नाव आहे.

# विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका अन् उत्तर पत्रिका

## इयत्ता पाचवी अन् आठवी: ढकलपास पद्धत आता कायमची बंद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत विद्यार्थ्यांना सरसकट पास करण्याची पद्धत आता बदलली आहे. इयत्ता पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांना सरसकट पास करणे बंद झाले आहे. सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा पारदर्शकपणे घेतली का, उत्तरपत्रिकांची तपासणी व गुणदान बिनचूक आहे की नाही?, याची पडताळणी आता 'डायट'चे अधिकारी व शिक्षणाधिकारी करणार आहेत. त्यासाठी सर्व शाळांना पाचवी व आठवीतील विद्यार्थ्यांच्या प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका वर्षभर जनत करून ठेवाव्या लागणार आहेत.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या माध्यमातून आता पाचवी व आठवीच्या परीक्षांवर लक्ष ठेवले जाणार आहे. प्रत्येक जिल्ह्यातील शाळांमधील या इयत्तेतील विद्यार्थ्यांची पारदर्शकपणे परीक्षा घेतली जाते का?, याची पडताळणी प्राथमिक शिक्षणाधिकारी व जिल्हा शैक्षणिक प्रशिक्षण संस्थेच्या (डाएट) माध्यमातून होणार आहे. काही दिवसांपूर्वी पाच ते १६ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसंदर्भातील अहवाल प्रसिद्ध झाला. त्यात इयत्ता पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांना अंक ओळख, वजाबाकी, भागाकार देखील येत नसल्याची बाब समोर आली.

अनेकांना वाचायला देखील जमत नसल्याचे या सर्व्हेतून उघड झाले. दुसरीकडे सरकारी शाळांमधील प्रवेश देखील गुणवत्तेच्या कारणामुळे घटल्याची बाब स्पष्ट झाली. शाळांची गुणवत्ता वाढावी, विद्यार्थ्यांना महत्त्वाच्या इयत्तेत पुढे जाताना त्यांच्या बौद्धिक पातळीचा विचार व्हावा, यासाठी आता पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी ढकलपास पद्धत करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर आता पाचवी आणि आठवीतील विद्यार्थ्यांची परीक्षा पारदर्शकपणे घेण्याचे नियोजन 'एससीईआरटी'कडून करण्यात आले आहे.



### अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पास होण्यासाठी दोन संधी

- इयत्ता पाचवी व आठवीतील विद्यार्थ्यांना स्वतंत्र प्रश्नपत्रिका तयार करून दिल्या जातात. एप्रिलमध्ये या विद्यार्थ्यांची परीक्षा होईल. त्यात अनुत्तीर्ण झालेल्यांची पुढे मे-जून महिन्यात फेरपरीक्षा घेतली जाणार आहे. याही परीक्षेत अनुत्तीर्ण झालेला विद्यार्थी त्याच वर्गात राहणार असून त्याला पुढच्या वर्गात प्रवेश मिळणार नाही. त्यांची परीक्षा पारदर्शकपणे घेण्यात आली की नाही, याची पडताळणी प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिकांच्या आधारे केली जाणार आहे.

राज्यात एक लाख मराठा उद्योग तयार

# एक हजार आर्थिक मागास विकास महामंडळाचे लाभार्थी - नरेंद्र पाटील

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**जळगाव :** : इतर जिल्ह्यांच्या मानाने जळगाव जिल्ह्यामध्ये अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या लाभ घेणारे 1000 लाभार्थी जिल्ह्यात आहेत. ती वाढवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे वक्तव्य अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना केले.

**संवाद**

शेतकरी उद्योगपती झाल्यास चांगले होईल असेही वक्तव्य यावेळी त्यांनी केले

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील हे जळगाव दौऱ्यावर आले असता त्यांनी आढावा बैठक घेतली. या आढावा बैठकीनंतर जिल्हा परिषदेच्या कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले की, 2018 ते 2025 या काळात जळगाव जिल्ह्यामध्ये 1000 युवकांनी या महामंडळाचा लाभ घेतला आहे.

जळगाव जिल्ह्यामध्ये मराठा कुणबी हे जातीचे प्रमाणपत्र मिळत असल्याने त्यांना ओबीसी आर्थिक मागास गटाकडे मागणी करावी लागत आहे. मात्र यापुढे एल वाय मधून तो दाखला घेतल्यास त्यांना यामधून लाभ घेता येईल तसेच शेतकरी यांना उद्योगपती करण्यासाठी मदत करणारे उद्योगपती झाल्यास चांगले होईल असे ते म्हणाले तसेच व्यावसायिक वाढल्यास समाजाची ही प्रगती होईल व ही संख्या वाढवण्यासाठी प्रत्येक तालुका स्तरावर या योजनांचा लाभ काय आहे व याचा प्रचार प्रसार करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ते म्हणाले, 2018 नंतर मधल्या कार्ड सोडल्यास राष्ट्रीयकृत बँक व क्रेडिट खाजगी बँकांनी उद्योजकांना चांगली मदत केली असल्याचे ते म्हणाले सध्याला राज्यात एक लाख मराठा उद्योग तयार झाले आहेत दहा कोटी पर्यंत कर्ज वाटप झालेला आहे सरकारने आतापर्यंत एक लाख कोटीचा परतावा केलेला आहेत. यासाठी आता दर तीन महिन्यांनी हे अशा आढावा बैठका घेऊन तसेच गावोगावी मराठी युवकांना कसा लाभ मिळेल यासाठी प्रयत्न करणार असल्याचे वक्तव्य नरेंद्र पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना केले.

# अर्थसंकल्प जाहीर; बाजार स्थिरच



**मुंबई :** अर्थसंकल्प जाहीर झालेल्या दिवशी शनिवारी अस्थिर सत्रात भारतीय शेअर निर्देशांक अल्प वाढीसह बंद झाले. निर्देशांक ५.३९ अंकांनी वधारून ७७,५०५.९६ वर, तर निफ्टी २६.२५ अंकांनी घसरून २३,४८२.१५ वर बंद झाला. निफ्टीवर एल अँड टी, भारत इलेक्ट्रॉनिक्स, पॉवर ग्रिड कॉर्प, ग्रासिम इंडस्ट्रीज, सिप्ला यांचे समभाग सर्वाधिक घसरले, तर ट्रेंट, मारुती सुझुकी, टाटा कन्झ्युमर, आयशर मोटर्स, बजाज ऑटो यांचे समभाग वधारले.ग्राहकोपयोगी वस्तू निर्देशांक ३ टक्के, रियल्टी निर्देशांक ३.३ टक्के, वाहन निर्देशांक १.९ टक्के, मीडिया निर्देशांक २ टक्के आणि एफएमसीजी निर्देशांक ३ टक्क्यांनी वधारले. कॅपिटल गुड्स, पॉवर, पीएसयू निर्देशांक २-३ टक्के आणि मेटल, आयटी, एनर्जी निर्देशांक १-२ टक्क्यांनी घसरले. बीएसईमिडकॅप निर्देशांक ०.५ टक्क्यांनी घसरला, तर स्मॉलकॅप निर्देशांक ०.३ टक्क्यांनी वधारला.तत्पूर्वी, सकाळच्या सत्रात, केंद्रीय अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वी भारतीय शेअर बाजाराने सकारात्मकता नोंदवली. प्रमुख निर्देशांक आणि निफ्टी शनिवारी सकाळी १३६ अंकांनी वधारला, तर निफ्टी २० अंकांनी वधारला.

भांडवली खर्च आणि ऊर्जा क्षेत्रासाठी मोठ्या निधीची गुंतवणूकदारांना अपेक्षा असल्याने, अर्थमंत्र्यांच्या भाषणापूर्वी बहुतांश क्षेत्रीय निर्देशांक वधारले आणि निफ्टी रिअल्टी आणि निफ्टी एनर्जी यांनी तेजीचे नेतृत्व केले. निफ्टी ऑईल अँड गॅस, निफ्टी फायनान्स आणि निफ्टी बँक यांचे समभाग घसरले.

अदानी समूहाचे सर्व समभाग हिरव्या रंगात असून अदानी ग्रीन आणि एनडीटीव्ही या तेजीचे नेतृत्व करत आहेत. आयनॉक्स विंड, आयनॉक्स विंड एनर्जी, केपीआय ग्रीन आणि सुझलॉन या कंपन्यांच्या शेअरमध्ये तेजी दिसून आली. बीईएमएल आणि हिंदुस्थान एरोनॉटिक्ससारखे संरक्षण समभागही हिरव्या रंगात आहेत.

### भाजप नेते किरीट सोमय्यांना धमकी!

**मुंबई :** भाजप नेते किरीट सोमय्या यांनी मालेगावातील जन्म दाखला घोटाळा उघडकीस आणला. परंतू, आता मालेगावच्या काँग्रेस, उबाठा आणि एमआयएमच्या आमदार, खासदारांकडून धमक्या देण्यात येत असल्याची माहिती पुढे आली आहे. किरीट सोमय्या म्हणाले की, "मालेगावचे काँग्रेस, उद्धव ठाकरे सेना, आणि एमआयएमचे आमदार, खासदार मला आता धमक्या देत आहेत. बांग्लादेशी आणि रोहिंग्यांच्या विरोधात आंदोलन केल्यास आम्ही आम्ही किरीट सोमय्यांना जाब देणार असल्याची भूमिका त्यांनी घेतली आहे." मालेगावमध्ये ३ हजार ९७७ बांगलादेशी रोहिंग्यानी अर्ज केला असून खोटे कागदपत्र दिले. त्यामुळे त्यांच्या विरोधात पोलिस कारवाई झालीच पाहिजे असे सांगत या सर्वांना बांग्लादेशला परत पाठवणार असल्याचे किरीट सोमय्यांनी स्पष्ट केले.

# कर्नाटकात 'सन्मानाने मरण्याचा अधिकार' लागू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बंगळुरु :** गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांना सन्मानाने मरण्याचा अधिकार देणारा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश कर्नाटकने लागू केला आहे. ही पॉलिसी ज्यांना दीर्घ आजार आहे किंवा ज्यांना हॉस्पिटलमध्ये लाइफ सपोर्ट सिस्टमवर असूनही बरे होण्याची कोणतीही शक्यता नाही त्यांना लागू होते.

कर्नाटकचे आरोग्य मंत्री दिनेश गुंडू राव यांनी जाहीर केले की, 'रुग्णांना सन्मानाने मरण्याचा अधिकार' या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाची अंमलबजावणी करण्यासाठी राज्याच्या आरोग्य विभागाने ऐतिहासिक आदेश जारी केला आहे. त्यांनी एका पोस्टमध्ये म्हटले आहे

आरोग्य मंत्री दिनेश गुंडू राव म्हणाले, 'सन्मानाने मरण्याच्या अधिकाराच्या अंमलबजावणीमुळे ज्यांच्यापासून बरे होण्याची कोणतीही आशा नाही आणि ज्या रुग्णांना जीवनरक्षक उपचाराचा लाभ मिळत नाही अशांना मोठा फायदा होईल . आम्ही एक आगाऊ वैद्यकीय निर्देश देखील तयार केला आहे, ज्यामध्ये रुग्ण त्यांच्या भविष्यातील उपचारांबद्दल त्यांच्या इच्छा नोंदवू शकतात.

नवीन नियमांनुसार, प्रत्येक प्रकरणाचा दोन-चरणीय वैद्यकीय पुनरावलोकन प्रणाली अंतर्गत निर्णय घेतला जाईल. तीन डॉक्टरांचे एक मंडळ रुग्णाच्या प्रकृतीचे मूल्यांकन करेल. तीन डॉक्टर आणि सरकारने नियुक्त केलेले दुसरे बोर्ड कोर्टाला अहवाल पाठवण्यापूर्वी निष्कर्षांचे पुनरावलोकन करेल. न्यायालयाने मान्यता दिल्यास, रुग्णाचा जीवन समर्थन वैद्यकीय देखरेखीखाली काढून घेतला जाईल, ज्यामुळे त्याला शांततेने मरण येऊ शकेल. रुग्णाच्या कुटुंबीयांच्या विनंतीनंतरच ही प्रक्रिया सुरू होईल.

कर्नाटक सरकारचे हे पाऊल सुप्रीम कोर्टाच्या निर्देशानुसार आहे, ज्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने असाध्य आजारांनी ग्रस्त रुग्णांना दीर्घकाळ त्रास होण्यापासून वाचवण्यासाठी 'सन्मानाने मरण्याचा अधिकार' विचारात घेण्यास सांगितले होते. कर्नाटक सरकारने आपल्या आदेशात म्हटले आहे की, मानवी अवयव आणि प्रत्यारोपण कायदा, 1994 अंतर्गत योग्य प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या कोणत्याही न्यूरोलॉजिस्ट, न्यूरो सर्जन, शल्यचिकित्सक, भूलतज्ज्ञ किंवा अतिदक्षता तज्ज्ञाने जिल्ह्याद्वारे अशा मृत्यूचे प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे. आरोग्य अधिकारी वैद्यकीय तज्ञांना दुय्यम मंडळाचे सदस्य म्हणून नामनिर्देशित केले जाईल.

हा आदेश राज्यभरात सर्व वैद्यकीय आस्थापनांवर लागू करण्यात आला आहे, ज्यात खाजगी आणि सरकारी सुविधा आहेत, जेथे अशा रुग्णांना दाखल केले जाते. गोवा, महाराष्ट्र आणि केरळ या राज्यांनीही याबाबत काही नियम आणि सूचना पारित केल्या आहेत, परंतु प्रयत्न अद्याप अपूर्ण आहेत. अशाप्रकारे 'सन्मानित मृत्यूचा अधिकार' लागू करणारे कर्नाटक हे भारतातील पहिले राज्य ठरले आहे. या निर्णयाला इच्छामरणाच्या संभ्रमात टाकू नये, असे कर्नाटकचे आरोग्यमंत्री दिनेश गुंडू राव यांनी स्पष्ट केले. हे फक्त अशा रूग्णांना लागू होते जे लाइफ सपोर्टवर आहेत आणि जीव वाचवणाऱ्या उपचारांना प्रतिसाद देत नाहीत.

### कराडमध्ये सापडला जीबीएसचा रुग्ण?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**कराड :** कराड शहरात जीबीएसचा एक रुग्ण सापडला असल्याच्या चर्चेने तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. मात्र, याबाबतची माहिती घेण्यासाठी गटविकास अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता ते याबाबत पूर्णपणे अनभिज्ञ असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. तर तालुका वैद्यकीय अधिकारीही संपर्कहीन असल्याने याबाबतची माहिती लपवण्यामागचा नेमका उद्देश काय? हा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित होत आहे. करोनानंतर जीबीएस (गुईलेन बॅरी सिंड्रोम) या संसर्गजन्य रोगाने डोके वर काढले आहे.राज्यात अनेक जिल्ह्यांत याचे रुग्ण आढळले आहेत.

# १२ प्रवासी असलेली क्रूझर कार कोसळली कालव्यात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क






**नवी दिल्ली :** हरियाणामध्ये धुक्यामुळे भयानक अपघात झाल्याचा प्रकार समोर आला आहे. शुक्रवारी रात्री हरियाणाच्या फतेहाबाद येथे दाट धुक्यामुळे १२ प्रवासी असलेली क्रूझर कार भाकरा कॅनलमध्ये कोसळली असून १० जण बेपत्ता झाले आहेत. रात्री उशीरपर्यंत बचाव कार्य सुरू होते, पण प्रशासकीय अधिकाऱ्यांनी १० वर्षीय मुलाला वाचवण्यात यश मिळाले तसेच एका ५५ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार वाहनाचा चालक जरनैल सिंग याने वाहन पाण्यात पडण्याची आधीच बाहेर उडी घेतली आणि तो सुखरुप बचावला.

पंजाबमधील एका कार्यक्रमात सहभागी होऊन हे सर्वजण घरी परतत होते. रात्री १० च्या सुमारास सरदारेवाला गावाजवळ पुल ओलांडताना धुक्यामुळे व्यवस्थित दिसत नसल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. यामुळे वाहन पुलावरून खाली कॅनलमध्ये कोसळले. गाडी जेव्हा पाण्यात कोसळली तेव्हा त्यामध्ये १२ प्रवासी होते. बचाव पथकाने एका अरमान नावाच्या १० वर्षाच्या मुलाला वाचवले आहे, तर बलबीर सिंग (वय ५५) यांचा मृतदेह कॅनलमधून बाहेर काढला आहे.

या अपघाताबद्दल माहिती मिळताच स्थानिक रहिवासी आणि पोलीस अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी धावून आले. बचाव आणि मदत कार्य रात्रभर कॅनलमध्ये प्रवाशांचा शोध घेत होते.

### सांगलीत ३० टन नवीन बेदाण्याची आवक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**सांगली :** मार्केट यार्डात शुक्रवारी निघालेल्या नवीन बेदाणा सौद्यास सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी ३० टन बेदाण्याची आवक झाली होती. हिरव्या बेदाण्यास प्रतिकिलो २२५ तर पिवळ्या बेदाण्यास १९१ रुपये दर मिळाला. बेदाण्याचे उत्पादन कमी असल्यामुळे दर तेजीत राहण्याचा व्यापाऱ्यांचा अंदाज आहे.सांगली बाजार समितीमध्ये नूतन बेदाणा सौद्याचा प्रारंभ सभापती सुजय शिंदे यांच्या हस्ते केला. यावेळी संचालक जयाभाऊ नलवडे, शशिकांत नागे, पप्पू मजलेकर, कडप्पा वारद, सचिव महेश चव्हाण, व्यापारी उपस्थित होते.

# केंद्रांवरील पर्यवेक्षक, केंद्र संचालक बदलणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** : पुणे विभागातील तीन जिल्ह्यांमध्ये इयत्ता दहावीसाठी ६६० केंद्रे असून इयत्ता बारावीच्या परीक्षेसाठी ४३२ केंद्रे आहेत. त्यातील इयत्ता दहावीच्या १३९ तर इयत्ता बारावीच्या १२५ केंद्रांवर २०१८ पासून कॉपीसारखे गैरप्रकार आढळले आहेत. अशा केंद्रांची माहिती बोर्डाने एकत्रित केली असून त्या केंद्रांवरील पर्यवेक्षक व केंद्र संचालकांची अदलाबदल होणार हे निश्चित झाले आहे.





कॉपीमुक्त परीक्षेसाठी पुणे बोर्डाने मुख्यमंत्र्यांच्या १०० कलमी कार्यक्रमाअंतर्गत दहावी-बारावीच्या परीक्षा केंद्रांवरील पर्यवेक्षक व केंद्र संचालकांची अदलाबदल करण्याचा निर्णय घेतला होता. पण, त्याला शिक्षक, मुख्याध्यापक संघटनांसह शिक्षक आमदारांनी विरोध केला. याची दखल घेत बोर्डाने २०१८ पासून (कोरोना काळ वगळून) ज्या परीक्षा केंद्रांवर कॉपीसारखे गैरप्रकार झाले, त्याच केंद्रांवरील पर्यवेक्षक व केंद्र संचालकांची अदलाबदल करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार किती व कोणत्या केंद्रांवर गैरप्रकार घडले, याची माहिती संकलित केली आहे. त्यात पुणे विभागातील एकूण २६४ केंद्रे आहेत, ज्या केंद्रांवर २०१८ पासून कॉपी प्रकार झाले होते. त्यात सोलापूर जिल्ह्यातील दहावीचे ४७ तर बारावीची ३४ परीक्षा केंद्रे आहेत. दरम्यान, शिक्षणाधिकाऱ्यांच्या माध्यमातून आता त्या केंद्रांवरील पर्यवेक्षक व केंद्र संचालक अन्य शाळांमधील नेमले जाणार आहेत.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक शाळांमध्ये सीसीटीव्ही बंधनकारक आहेत, पण अनेक शाळांवर कॅमेरे नाहीत. त्यामुळे कॉपीमुक्त परीक्षेची जबाबदारी आता प्रत्येक जिल्ह्यातील सात भरारी पथकांवर असणार आहे. भरारी पथकांना परीक्षा काळात प्रत्येक केंद्रांना भेटी द्याव्या लागतील. याशिवाय तेथील बैठे पथकालाही कॉपी होणार नाही, यासाठी दक्ष राहावे लागणार आहे. मात्र, आता ज्या केंद्रावर गैरप्रकार घडेल, त्याचा परवाना कायमचा रद्द केला जाणार आहे.

| जिल्हा | गैरप्रकार आढळलेली केंद्रे |
|---|---|
| पुणे | ३५ |
| अहिल्यानगर | ५६ |
| सोलापूर | ३४ |
| एकूण | १२५ |

इयत्ता दहावी

| जिल्हा | गैरप्रकार आढळलेली केंद्रे |
|---|---|
| पुणे | ४२ |
| अहिल्यानगर | ५० |
| सोलापूर | ४७ |
| एकूण | १३९ |

### राज्यात लवकरच नवीन वाळू धोरण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यातील बहुतांश जिल्ह्यामध्ये आज वाळूची समस्या निर्माण झाली असली तरी राज्य सरकार लवकरच नवीन वाळू धोरण तयार करणार आहे. त्यानुसार गावातल्या गावातच नागरिकांना बांधकामासाठी तसेच घरकुलांसाठी अगदी सहजपणे वाळू उपलब्ध होणार आहे, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी येथे सांगितले. महसूलमंत्री म्हणाले, प्रतिनागपूर म्हणून अमरावती जिल्ह्याकडे पाहिले जाते. अमरावती जिल्ह्यातील रखडलेले प्रकल्प तसेच विकासात्मक कामांना अधिक गती दिली जाणार आहे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या दृष्टीने महायुतीमधील सर्व घटक पक्षांसोबत चर्चा केली जाईल, मात्र अंतिम निर्णय स्थानिक पातळीवर होईल.

# राज्यात जीबीएसचा चौथा बळी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** जीबीएस हा आजार रुग्णांच्या जीवावर उठला असून आतापर्यंत चार जणांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. जीबीएस आजारावर नियंत्रण मिळण्यासाठी आरोग्य यंत्रणा अलर्ट झाली आहे. याच पार्श्वभूमीवर नागरिकांसाठी मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आली. राज्यातील जीबीएस रुग्णांची संख्या १४० वर पोहोचली आहे, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्याने दिली आहे. जीबीएसच्या या १४० संशयित रुग्णांपैकी तब्बल ९८ जणांची जीबीएस चाचणी पॉझिटिव्ह आली आहे.

यामध्ये मनपा क्षेत्रातील २६, मनपा क्षेत्रातील नव्याने समाविष्ट झालेल्या गावांतील ७८, पिंपरी-चिंचवड महापालिकेतील १५, पुणे ग्रामीणमधील १० आणि इतर जिल्ह्यातील ११ रुग्णांचा समावेश आहे.

पुणे जिल्ह्यातील विविध रुग्णालयात उपचार घेत असलेले १८ जीबीएस रुग्ण व्हेंटिलेटरवर असल्याची माहिती आरोग्य सेवा सहसंचालक डॉ. बबिता कमलापूरकर यांनी दिली. डॉ. कमलापूरकर म्हणाले की, 'आरोग्य विभागाने जिल्ह्यातील जीबीएसग्रस्त भागात घरोघरी जाऊन पाहणी सुरू केली असून यामध्ये मनपामधील ४० हजार ४५७, पिंपरी-चिंचवड महापालिकेतील १० हजार ७१८ आणि पुणे ग्रामीण भागातील १२ हजार २९५ अशा एकूण ६३ हजार ४७० घरांचा समावेश आहे.

# अमरावती जिल्ह्यातील निष्क्रीयता दूर करणार!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अमरावती :** अमरावती जिल्ह्यात असलेली निष्क्रीयता दूर करण्यासाठी प्रयत्न करणार असून यापुढे अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार चालणार नाही, अशी तंबी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

अमरावती जिल्ह्याच्या पालकमंत्रीपद स्विकारल्यानंतर अमरावती जिल्हा नियोजन समिती आणि जिल्ह्यातील सर्व शासकीय विभाग प्रमुखांची बैठक घेतली.

त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, "पारधी समाजापासून तर मेळघाटातील आदिवासी भागातील जनतेची निवदने मला मिळाली. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी वेळोवेळी जनतेला भेटल्यास ९० टक्के प्रश्न सुटू शकतात, हे यावरून लक्षात आले. परंतु, आज सर्व विभागांमध्ये थोडा सुस्तपणा वाटला.

**बैठक**

जनतेला न भेटणे, काही प्रकरणांमध्ये टाळाटाळ करणे, काही ठिकाणी अजूनही जिल्हा नियोजन समितीचा निधी खर्ची न घालणे, अशा अनेक प्रश्नांवर चर्चा केली. पुढच्या १-२ महिन्यात पुन्हा एकदा जिल्हा नियोजन समितीची बैठक घेणार असून मागच्या तीन वर्षांच्या निधीच्या कामकाजाचे सादरीकरण घेणार आहे.

# एसटीत होणाऱ्या सुट्ट्या पैशांच्या वादावर तोडगा!

## यूपीआय

**सुट्ट्या पैशांवरुन प्रवाशांच्या तक्रारी आणि वाहकांना होणारा त्रास यांची परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दखल घेतली आहे. त्यांनी केलेल्या सूचनेनुसार सुट्ट्या पैशांवरुन वाहक आणि प्रवाशांमध्ये वाद होऊ नये, यासाठी एसटीने प्रवाशांना यूपीआय पेमेंटद्वारे तिकीट काढण्याचे आवाहन केले आहे.**

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** : एसटीमध्ये प्रवाशी आणि वाहकामध्ये सुट्ट्या पैशांवरून होणाऱ्या वादावर परिवहन विभागाने तोडगा काढला आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यूपीआय पेमेंटद्वारे तिकीट काढण्याचे आवाहन केले आहे.

मंत्री प्रताप सरनाईक यांनी प्रवाशांच्या तक्रारी आणि वाहकांना होणाऱ्या त्रासाची दखल घेतली. सुट्ट्या पैशावरून वाहक आणि प्रवाशांच्यामध्ये वाद होऊ नये यासाठी एसटीने प्रवाशांना यूपीआय पेमेंटद्वारे तिकीट काढण्याचे आवाहन केले आहे. याला प्रवाशांचा भरघोस प्रतिसाद मिळत असून मागील काही दिवसांपासून युपीआय पेमेंटद्वारे मिळणारे उत्पन्न दुपटीने वाढले असल्याची माहिती पुढे आली आहे. तसेच वाहकांना कर्तव्यावर जाण्यापूर्वी आग्रधन रकमेमध्ये १०० रुपयापर्यंत सुट्टे पैसे देण्याचे निर्देश स्थानिक प्रशासनाला एसटी महामंडळाकडून देण्यात आले आहेत.



यासोबतच महामंळाने युपीआय पेमेंट वाढविण्यासाठी प्रयत्न केला आहे. गेल्या काही दिवसांमध्ये युपीआय पेमेंटद्वारे तिकीट काढणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली असून युपीआय पेमेंटद्वारे मिळणारे उत्पन्न दुपटीने वाढले आहे. तसेच भविष्यात वाहक आणि प्रवासी यांच्यात सुट्ट्या पैशावरून वाद उद्भवणार नाहीत याची काळजी घेण्याच्या सूचना प्रताप सरनाईक यांनी दिल्या आहेत.

**यूपीआय पेमेंटद्वारे तिकीट काढण्याचे परिवहन मंत्र्यांचे आवाहन**

यूपीआय पेमेंटद्वारे उत्पन्न तिकीट (दर वाढल्यानंतर)
- २६ जानेवारी २०२५ - १ कोटी ५३ लाख ५ हजार ८६४
- २७ जानेवारी २०२५ - १ कोटी ४६ लाख ४ हजार २७२
- २८ जानेवारी २०२५ - १ कोटी २५ लाख १८ हजार ८३
- २९ जानेवारी २०२५ - १ कोटी १९ लाख ८२ हजार ८४१
- ३० जानेवारी २०२५ - १ कोटी २५ लाख ८० हजार ८७१

**करमाळा :** करमाळा शहर विकासासाठी देण्यात आलेल्या 21 कोटी 75 लाख रकमेच्या प्रस्तावावर नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व कामांचे अंदाजपत्रक व ठराव निश्चित करून घ्यावेत, अशा सूचना नगर विकास खात्याला केल्या आहेत. करमाळा शहर विकासाचा प्रस्ताव शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सादर केला. या सर्व कामाचे अंदाजपत्रक तयार करून ठराव निश्चित करून घ्यावेत असे आदेश विकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.


## At a Glance

### सेंद्रिय शेतीला भविष्य, शेतकऱ्यांनी विचार करावा



**अक्कलकोट :** शेतकऱ्यांनी शेतीत रासायनिक निविष्ठांचा वापर कमी करावा आणि सेंद्रिय शेतीकडे वळावे, माझ्या अनुभवातून हे सांगतो, भविष्यात सेंद्रिय शेतीलाच भविष्य असणार आहे, असे अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले. कृषी विज्ञान केंद्राच्यावतीने आयोजित कृषी तंत्रज्ञान महोत्सवाचे उद्घाटन आमदार कल्याणशेट्टी यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. शबरी कृषी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रदीप गायकवाड अध्यक्षस्थानी होते.

### ॲट्रॉसिटी प्रकरणातून आरोपीची जामीनावर मुक्तता



**मंगळवेढा :** मंगळवेढा शहरातील नागणेवाडी येथील आरोपी नाना ज्ञानेश्वर जगताप याची जातीवाचक शिवागळ व मारहाण केल्याप्रकरणी पंढरपूर येथील जिल्हा व सत्र न्यायाधिश श्री. सुरवसे सो यांनी जामीनावर मुक्तता केली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, दि. १६ डिसेंबर २०२४ रोजी नाना ज्ञानेश्वर जगताप याने जातीवाचक शिवीगाळ व मारहाण केल्याबाबत मंगळवेढा पोलीस स्टेशन येथे भा. न्या. स. २०२३ चे कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(१), ३५१(३), ३(५) व अनुसूचित जाती व असूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा कलमप्रमाणे फिर्याद दाखल केली होती.

### मुलाची आत्महत्या नव्हे तर खून झाला

**माढा :** माढ्यातील एका 14 वर्षांच्या मुलाने गोळी झाडून आत्महत्या केल्याच्या प्रकरणाला आता नवीन वळण लागलं आहे. आपल्या मुलाने आत्महत्या केली नाही तर त्याचा खून करण्यात आल्याचा आरोप सैन्यदलात नोकरीला असलेले त्याचे वडील गणेश नष्टे यांनी केला. या प्रकरणात पोलिसांनी तपास करावा आणि न्याय द्यावा अशी मागणीही त्यांनी केली. सैन्यदलात असलेल्या वडिलांच्या पिस्तुलमधून गोळी मारून घेऊन मंगळवारी माढा तालुक्यातील आलेगाव येथील श्रीधर गणेश नष्टे या सातवीत शिकणाऱ्या मुलाने आत्महत्या केल्याची घटना घडली होती.

# आज विठ्ठल रुक्मिणीचा शाही विवाह सोहळा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** माघ पंचमी निमित्य श्री विठ्ठल रुक्मिणीचा शाही विवाह सोहळा आज रविवारी 2 फेब्रुवारी रोजी विठ्ठल मंदिरातील सभा मंडपात दुपारी बारा वाजता होणार आहे. विवाह सोहळ्याची तयारी मंदिर समितीने पूर्ण केली आहे. विवाह समारंभाच्या पार्श्वभूमीवर गेल्या चार दिवसापासून विठ्ठल मंदिरात रुक्मिणी स्वयंवर कथेचे आयोजन करण्यात आले आहे.

कथा ह. भ. प. अनुराधादीदी शेटे सांगत आहेत. या महिलांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आज रविवार 2 फेब्रुवारी रोजी दुपारी बारा वाजता विठ्ठल रुक्मिणीचा शाही विवाह सोहळा विठ्ठल मंदिरातील सभागृहात होणार आहे. या पार्श्वभूमीवर विठ्ठल रुक्मिणी मंदिर आकर्षक फुलांनी सजावट करण्यात आले आहे. विवाह सोहळ्याची भाविकांना मंदिरात प्रवेश देण्यात येणार आहे. विवाह सोहळा झाल्यानंतर दुपारी बारा वाजल्यापासून आलेल्या भाविकांना अन्नछत्रांमध्ये स्नेहभोजन देण्यात येणार आहे. यानंतर सायंकाळी सहा वाजता विठ्ठल रुक्मिणीची भव्य मिरवणूक प्रदक्षिणा




मार्गावरून काढण्यात येणार आहे. विवाह समारंभासाठी कर्नाटक बेंगलोर येथील भाविकांनी विठ्ठल रुक्मिणीसाठी खास पोशाख भेट दिला आहे. या नवीन पोशाखावर विठ्ठल रुक्मिणीचा विवाह सोहळा होणार आहे.

## जिल्ह्यातील 22 हजार शेतकऱ्यांना ओळख क्रमांक वाटप



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** शेतकऱ्यांकडे असलेली जमीन आधारशी जोडून स्वतंत्र ओळख क्रमांक राज्यात ॲग्री स्ट्रॅक योजना सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील २२ हजार ४१० शेतकऱ्यांना ओळख क्रमांक वाटप करण्यात आला आहे.

शासनाच्या विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना कागदपत्र द्यावे लागतात. यासाठी शासकीय कार्यालय व बँकेत हेलपाटे मारावे लागतात अनेक वेळा सर्वर डाऊन झाल्यास शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळण्यास अडचण निर्माण होते. यामुळे शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळावा यासाठी शासनाने अँग्री ट्रॅक योजना सुरू केली आहे. या अंतर्गत शेतकऱ्यांच्या शेतजमिनीशी शेतकऱ्यांचा आधार क्रमांक व इतर कागदपत्रे केवायसी करून शेतकऱ्यांना ओळख क्रमांक देण्यात येत आहे. याची सुरुवात करण्यात आली असून राज्यात 10 लाख 50 हजार शेतकऱ्यांना ओळख क्रमांक देण्यात आले आहे. यात सोलापूर जिल्ह्यातील 22 हजार 410 शेतकऱ्यांना ओळख क्रमांक देण्यात आले आहे. ओळख क्रमांक देण्याचे काम सुरू आहे. लवकरच सर्व शेतकऱ्यांना ओळख नंबर देण्यात येणार आहे. यानंतर शेतकऱ्यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणतीही अडचण येणार नाही. शासनाने अँग्री ट्रॅक योजना सुरू केल्यामुळे शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे.यापुढे शेतकऱ्याना कोणत्याही योजनेचा लाभ घेताना या ओळखपत्राचा उपयोग होणार आहे.

## बर्ड फ्यु पार्श्वभूमीवर पशुवैद्यकीय विभाग अलर्ट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** राज्यात काही जिल्ह्यात बर्डफ्यूचा शिरगाव झाला आहे. या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्हा पशुवैद्यकीय विभाग अलर्ट झाला आहे. अचानक कोंबड्या मृत्यू पावत असल्यास याची माहिती शेतकऱ्यांनी पशुवैद्यकीय विभागास द्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे शेतातील पिकांचे नुकसान होत असल्याने शेतकरी शेतीस जोड व्यवसाय म्हणून दुग्ध व कुक्कुटपालन करत आहे. यातून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळत आहे. सध्या दुधाला व अंड्याला चांगला दर असल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढत आहे. मात्र राज्यातील काही जिल्ह्यात बर्ड फ्ल्यू ने शिरकाव केला आहे. यामुळे कोंबड्या अचानक मृत्यू पावण्याचे प्रमाण वाढले आहे. म्हणून सोलापूर जिल्ह्यातील पशुवैद्यकीय विभागाने खबरदारी घेतली



असून शेतकऱ्यांना कोंबड्याचा खुराडा स्वच्छ ठेवणे व कोंबड्यावर लक्ष ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. कोंबड्या अचानक मरू लागल्यास याची माहिती पशुवैद्यकीय विभागास देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सोलापूर जिल्ह्यात शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर कुक्कुटपालन सुरू केले असून लाखो कोंबड्यांचा सांभाळ केला आहे. यामुळे बर्थ फ्ल्यूचा शिरगाव झाल्यास शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये याची खबरदारी पशुवैद्यकीय विभागाने घेतली आहे.



### तर शिवसेना स्टाईलने विरोध करू

**सोलापूर :** सोलापूर शहर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने प्रीपेड मीटर बसवण्यात येणार असल्याच्या वीज वितरणच्या भूमिकेला विरोध करण्यात आला आहे. शहर शिवसेनेच्या वतीने कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित सोलापूर यांना प्रीपेड मीटर बसवण्यास शिवसेनेचा विरोध असलेले निवेदन देण्यात आले. वीज ग्राहकांवर कसल्याही प्रकारची जबरदस्ती केल्यास शिवसेना स्टाईलने विरोध करणार असल्याचे स्पष्ट केले.

## पंढरपुरात गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** पंढरपूर शहरातील ज्ञानेश्वर नगर येथे एका तरुणाने घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. दोन दिवसापूर्वी यमाई तलावात एका तरुणाने उडी घेऊन आत्महत्या केली होती. याची चर्चा सुरू असतानाच पुन्हा शनिवारी सकाळी एका तरुणांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली.

ज्ञानेश्वर नगर झोपडपट्टीत राहणारा सुजल बंदपट्टे याने शनिवारी सकाळी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याचे उघड झाले आहे. नेहमीप्रमाणे सुजल हा घरात जेवण करून आपल्या खोलीमध्ये झोपण्यास गेला होता. मात्र सकाळ झाली तरी तो उठला नाही. म्हणून घरातील नातेवाईकांनी दरवाजा ढकलला असता सुजल याने गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याचे दिसून आले. याबाबत शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मयत अशी नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस करत आहे. सुजल यास क्रिकेट खेळण्याची आवड होती. यासाठी तो नियमित सराव करत होता. मात्र अचानक त्याने आत्महत्या केली असल्याने याबाबत चर्चा होऊ लागली आहे.

### गणेश मंदिरात दर्शनासाठी भाविकांची गर्दी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** गणेश जयंती निमित्त पंढरपुरातील विविध मंदिरामध्ये धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते गणेश जयंती निमित्त दर्शनासाठी मंदिरामध्ये भाविकांनी गर्दी केली होती गणेश जयंती निमित्त पंढरपुरातील अनेक मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम व गणेश याग तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते गणेश जयंतीच्या पार्श्वभूमीवर भाविकांनी विविध मंदिरामध्ये गणेशाचे दर्शन घेण्यासाठी गर्दी केली होती गोपाळपूर रोडवरील रिद्धी सिद्धी गणपती मंदिर पाखलपूर येथील गणपती मंदिर भोसले चौक येथील गणपती मंदिर चौफाळा येथील रिद्धी सिद्धी गणपती मंदिर येथे दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या असल्याचे दिसून आले मोठ्या उत्साहात गणेश जयंती साजरी करण्यात आली

## पंचकल्याणक समारंभाला उत्साहात प्रारंभ; ४० मुनींची उपस्थिती

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** जैन धर्मातील उदारवादी व्यक्तीमत्व आणि धार्मिक अनुष्ठाणाच्या प्रतिज्ञाबद्ध असलेले डॉ. शितल शहा व त्यांच्या पत्नी सौ. सुषमा दिदी या पती-पत्नीने आयोजित केलेल्या पंचकल्याणक महा महोत्सवाचा आज सकाळपासूनच जैन सांप्रदायिक मंद्घोषात शुभारंभ झाला असून आढीव पासून एक किलोमीटर अंतरावर असलेल्या तपोवन क्षेत्रात या समारंभाचे आयोजन करण्यात आले असून महाराष्ट्र, राजस्थान, कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेश वगैरे भागातून या समारंभासाठी जैन सांप्रदायिक भक्त उपस्थित झाले आहेत. आज सकाळी ८ वाजल्यापासून डॉ. शितल शहा व त्यांच्या पत्नी सौ. सुषमा दिदी यांनी येणाऱ्या भक्तगणाचे मोठ्या प्रेमाने स्वागत केले. ज्या मंदिरात प्राणप्रतिष्ठा होणार आहे. त्या मंदिरात सकाळपासून अनेक दीप प्रज्वलित करुन मूर्ती स्थापनेच्या संदर्भात जैन मंत्रोच्चार अनेक पंडितांकडून होत होते. या समारंभात अत्यंत शिस्त, साधेपणा आणि स्वागत करण्याची नम्र भूमिका यांचे पदोपदी दर्शन घडत होते. या समारंभासाठी देशभरातून आलेले सुमारे ४० मुनीगण एका मिरवणूकीच्याव्दारे या तपोवनात प्रवेश करणार असून चर्याशिरोमणि पट्टाचार्य १०८ आचार्य श्री विशुद्धसागरजी महामुनिराज यांच्या आशीर्वादाखाली या समारंभाचे नियोजन करण्यात आले आहे. भव्य-दिव्य मिरवणूकीने आलेल्या साधु आणि मुनींचे प्रवेशव्दारावर स्वागत करण्यात आले.

### दक्षिणच्या विकासासाठी एकत्र येऊ

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** सोलापूर सोशल फाउंडेशन यांच्याद्वारे किल्लेदार मंगल कार्यालयात आयोजित दक्षिण सोलापूर समृद्ध गाव अभियान तालुकास्तरीय कार्यशाळेत आमदार सुभाष देशमुख यांनी उपस्थिती लावली. यावेळी दक्षिण सोलापूर तालुक्यातील पुढील पाच वर्षात अनेक प्रकल्प मार्गी लावून तालुका मॉडेल करायचा असल्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. पुढील पाच वर्षात देगाव जलसेतू, धुबधुबी तलाव, वडापुर बॅरेजस, भीमा-सीना जोडकालवा, मंद्रूप एमआयडीसी, सीना नदीवरील ब्रिज कम बंधारे, यासाठी आपण सर्वजण एकत्र येऊ, असे मत व्यक्त केले.

### स्वागत....

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** आढीव येथील जैनधर्मियांच्या सुरु असलेल्या तपोवन येथील कार्यक्रमास दै.पंढरी संचारचे संपादक बाळासाहेब बडवे यांनी उपस्थिती लावली यावेळी त्यांचे स्वागत करताना डॉ. शितल शहा व त्यांचे चिरंजीव.

## इंग्लंडच्या सेबर तंत्रज्ञानाचा वापर

# चंद्रभागा नदीपात्रातील पाणी शुद्ध करण्यास सुरुवात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपुरात विठ्ठलाच्या दर्शनाला वर्षाला एक कोटीहून अधिक भाविक येतात. येणारे भाविक चंद्रभागा नदीमध्ये पवित्र स्नान करतात. नदीतील पाणी दूषित असल्यामुळे भाविकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे. याची दखल घेऊन शासनाने चंद्रभागा नदीतील पाणी शुद्ध करण्यासाठी इंग्लंडच्या सेबर तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. यामुळे दररोज दहा एमएलडी पाणी शुद्ध करण्यात येत आहे. यामुळे भाविकातून समाधान व्यक्त होत आहे. उजनी धरणातून सोडलेले पाणी चंद्रभागा नदीत येते. मात्र उजनी



धरणात पुणे जिल्ह्यातील दूषित पाणी येत असल्यामुळे ते पाणी पंढरपुरात चंद्रभागा नदीत येते. पंढरपुरात विठ्ठलाच्या दर्शनासाठी आलेले लाखो भाविक चंद्रभागा नदीमध्ये पवित्र स्नान करतात. नदीतील पाणी तीर्थ म्हणून प्राशन करतात. मात्र नदीमधील पाणी दूषित असल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. याची दखल घेऊन शासनाने चंद्रभागा नदी शुद्ध व निर्मल करण्याची योजना हाती घेतली आहे. या अंतर्गत नमामि चंद्रभागा योजना सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत नदीतील पाणी स्वच्छ करणे व वाळवंट स्वच्छ ठेवणे याकडे लक्ष केंद्रित केले आहे. पहिल्या टप्प्यात चंद्रभागा नदीतील पाणी शुद्ध करण्यासाठी इंग्लंडच्या सेबर तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. या आधारे चंद्रभागा नदीमध्ये चार मशीन बसविण्यात आल्या असून याद्वारे दररोज दहा एमएलडी पाणी शुद्ध करण्यात येत आहे. यामुळे भाविकांना शुद्ध पाण्यात पवित्र स्नान करण्याचा आनंद घेता येत आहे. या योजनेसाठी 25 ते 30 कोटी रुपये खर्च करण्यात येत आहेत.शासनाने चंद्रभागा नदीतील पाणी स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी प्रयत्न केल्यामुळे भाविकातून समाधान व्यक्त होत आहे.

### गड्डा यात्रेत एका तरुणावर चाकूने वार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**सोलापूर :** गड्डा यात्रेत मुलांना बोटीत बसवताना झालेल्या अरेरावीच्या घटनेनंतर एका तरुणावर बोट चालकाने चाकूने वार केल्याची घटना 28 जानेवारी रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी 15 जणांविरोधात सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी अनिल श्रीनिवास विटकर ( वय 21 राहणार रविवार पेठ, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. अनिल विटकर हे लहान मुलास बोट मध्ये बसविण्यासाठी गेले असतात बोट चालकाने त्यांना अरेरावी करत इतर साथीदारांना बोलावून घेत त्यांच्यावर चाकूने वार केला होता.

## अमृत स्नान चुकले भरपाई पोटी ५० लाख द्या !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**प्रयागराज :** आज सोशल मिडियावर व्हायरल झालेल्या एका टिप्पणीने संपूर्ण देशातील भक्तलोकांत प्रचंड खळबळ उडाली असून ज्यांनी रेल्वे, विमान किंवा अन्य वाहन आरक्षित करुन ठेवली होती. आणि या प्रवासी वाहनांच्या गलथान कारभारामुळे अनेकांना तो फटका बसून ते भाविक पवित्र स्नानाला मुकले आहेत. उत्तर प्रदेशमधील प्रयागराज येथे महाकुंभ मेळ्याच्या निमित्ताने अर्मृतस्नानासाठी चाललेल्या मुज्जफ्फरपूर येथील राजन झा या भक्ताने रेल्वेचे तिकीट बुक केले होते. दरम्यान ही रेल्वेच त्यांच्या तांत्रिक अडचणीमुळे येऊ न शकल्याने या परमभक्ताचे पवित्र अर्मृतस्नान चुकल्याने त्याने रेल्वे प्रशासनाकडे ५० लाख रुपयाची नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे. या व्हायरल झालेल्या वृत्ताने ज्या भक्तांची रेल्वे किंवा विमानाचे तिकीट आरक्षित करुन सुद्धा त्यांचा प्रवास होऊ शकला नाही अशा प्रवाशांनी झा यांच्या प्रमाणेच संबंधित प्रवासासाठी जाणाऱ्या वाहन संस्थेकडे नुकसानीची भरपाई मागण्याची तयारी सुरु केली आहे. यातील बहुसंख्य प्रवासी हे उत्तर हिंदुस्थान व मध्य प्रदेशातील असून महाराष्ट्रातील मुंबई येथील अशी मागणी केली असल्याचे वृत्त हाती आले आहे.